# प्रकरण दुसरे

## ब) "धाकटी पाती" या आत्मचरित्रामधून प्रकटणारे जीवनदर्शन :

### प्रास्ताविक :

श्री. सूर्यकांत मांडरे म्हणजे मराठी चित्रपट आणि नाट्यसृष्टीतील एक ज्येष्ठ आणि श्रेष्ठ कलावंत. जवळजवळ ५० वर्षे आपल्या विविध भूमिकेद्वारे त्यांनी अभिनयाच्या क्षेत्रात असामान्य कर्तृत्व दाखविले. अशा व्यक्तीचा, त्यांच्या व्यक्तित्वाचा, जीवनातील सुखदु:खांचा कर्तृत्वाचा साध्या सोप्या सरळ पण भावोत्कट शब्दांत रेखाटलेला जीवनलेख म्हणजे "धाकटी पाती" हे आत्मचरित्र होय. बालपणापासून ते वयाच्या ६१ व्या वर्षापर्यंतच्या आपल्या जीवनाचा वेध घेण्याचा प्रयत्न त्यांनी "धाकटी पाती" या आत्मचरित्रात केला आहे. "धाकटी पाती" असे शीर्षक देण्यात सूर्यकांतांच्या मनाचा मोठेपणा दिसतो. एवढ्या मोठ्या प्रदीर्घ कालखंडात एवढे कर्तृत्व केले असतानाही त्याचा त्यांना अहंकार नाही. चित्रपट क्षेत्रातील विविध घटकातील आपण एक घटक आणि त्यातही आपण एक छोटा घटक अशी एक विनयाची छटा त्या शीर्षकात मिसळली आहे. भालजी पेंढारकर, बाबा गजबर, चंद्रकांत मांडरे, राजा परांजपे, अनंत माने, राजा नेने ही त्यांच्या दृष्टीने या क्षेत्रातील त्यांना

"थोरली पाती" वाटतात. त्यांच्या मानाने आपण धाकटी पाती आहोत असे त्यांना वाटते. शीर्षकातील हा विनय हा या आत्मचरित्राचा पायाच आहे. आत्मचरित्राच्या सबंध लेखनावर जी छाप आहे ती या विनयशीलतेचीच. त्यामुळे हे आत्मचरित्र वैशिष्ट्यपूर्ण ठरले आहे.

आत्मचरित्राच्या प्रेरणा :

श्री. भालजी पेंढारकरांप्रमाणे सूर्यकांत मांढरे यांचाही पिंड साहित्यिकाचा नाही. भालजीप्रमाणे तेही एक कलावंत आहेत. आत्मचरित्र म्हणजे काय, त्याचे स्वरूप कसे असते याची त्यांना जाणीव नाही. आपण आत्मचरित्र लिहू अशी मुळातच त्यांची भूमिका नव्हती. परंतु चित्रपट व नाट्यसृष्टीत ५० वर्षे वावरल्याने त्यांना जे विविध प्रकारचे अनुभव आले. त्या अनुभवाच्या निवेदनाला इथे शब्दरूप मिळालेले आहे. अनुभव कथनाची ऊर्मी ही या आत्मचरित्राच्या मुळाशी असलेली प्राथमिक प्रेरणा होय. ही प्रेरणा त्यांना शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्यामुळे मिळाली. यासंबंधी त्यांनी स्वत:च म्हटले आहे - "एक दिवस शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांनी तर मला पेचातच टाकले. गप्पागोष्टीत सांगितलेल्या माझ्या आठवणी सरळ सरळ मला त्यांनी लिहायलाच सांगितल्या. मला लिहिता येत नाही हे माहीत असूनसुध्दा ! शेवटी त्यांच्या आग्रहाकरिता त्यांच्या शब्दाला मान द्यायचा म्हणून चित्रपटातील एक प्रसंग माझ्या साध्या सोप्या शब्दात मी भीतभीतच लिहिला तो त्यांनी १९६७ साली "माणूस" दिवाळी

अंकात छापला. हाच तो काय तो लिखाणाचा पहिला प्रसंग"[४७] असे असले तरी सूर्यकांतांना साहित्याविषयी प्रेम होते. अनेक साहित्यिकांचे साहित्य त्यांनी वाचले होते. साहित्यिकांचा सहवास त्यांना लाभलेला होता. कथा, पटकथा, संवाद याच्या दिग्दर्शनाचा त्यांना अनुभवही होता. त्यामुळे आठवणींचे हे लेख लिहिताना त्यांच्या लेखनाने साहित्य गुण आपोआपच प्रगट झाले आहेत. साहित्यगुण निर्माण होण्याचे आणखी एक कारण म्हणजे रोजनिशी लिहिण्याची सवय त्यांनी स्वतःच म्हटले आहे. "या आठवणी एकत्र करण्यास मला मदत झाली ती माझ्या रोजनिशीची. मला दैनंदिनी लिहिण्याची सवय लागली ती दादांच्यामुळे, नाहीतर आज मी जे तारीखवार लिहिलं आहे ते मला लिहिताच आले नसते."[४८] चित्रपट व नाट्य समीक्षक बापू वाटवे व अनंत अंतरकर, श्री. म. बा. वर्दे या व्यक्तींनी त्यांना लेखनास प्रवृत्त केले. या लेखनाच्या पाठीशी या व्यक्तींच्या ज्याप्रमाणे प्रेरणा आहेत त्याप्रमाणेच या लेखनाच्या पाठीशी आणखी एक प्रेरणा आहे ती म्हणजे विरंगुळा. मराठीतील श्रेष्ठ कादंबरीकार मालतीबाई बेडेकर यांनी म्हटल्याप्रमाणे - "मी लेखन करीत असले की रोजच्या जीवनातल्या सुख-दुःखाचा मला काही काळ तरी विसर पडतो, हा आजवरचा अनुभव याही वेळा प्रत्ययाला आला. आणि बरोबरच या "सहवास" लेखनाने माझ्या निवार दुःखाला विरंगुळा मिळाला."[४९] त्याचप्रमाणे प्रा मीर इसहाक शेख

यांनी म्हटल्याप्रमाणे, "गतायुष्याचे सिंहावलोकन करावे, हाही माणसाचा एक प्रवृत्तीधर्म असतो. आपल्या गतजीवनाचे सिंहावलोकन करताना तो जुन्या आठवणींची अपरिहार्यपणे उजळणी करतो, व त्याला एक प्रकारचा आनंद वाटतो. सुखाद आठवणींना उजाळा देण्याने आनंद वाटतोच, पण दुःखाद आठवणीही खूप काळ लोटल्यामुळे सुखादच वाटतात. या आठवणीकडे अलिप्तपणे पाहताना लेखकाला सविकल्प समाधीचा आनंद लुटता येतो."[50] स्वतः सूर्यकांत यांनीही म्हटले आहे- "यानंतर(म्हणजे पहिला लेख छापून आल्यानंतर) मात्र जीवनाची केलेली वाटचाल मागं वळून पाहाताना एक - एक प्रसंग बरेवाईट अनुभव आठवू लागले आणि एक विरंगुळा म्हणून वेड्यावाकड्या भाषेत शब्दांकित करीत राहिलो. असंख्या विखुरलेल्या आठवणी एकत्रित करून आठवणींची शिदोरी आपल्या सोबत रहावी हीच इच्छा."[51] अर्थात ही प्रेरणांची प्राथमिक कारणे आहेत. या आत्मचरित्र लेखनाच्या पाठीशी त्यांची जी प्रमुख प्रेरणा आहे ती त्यांनी स्वतःच स्पष्ट शब्दांत सांगितली आहे. आणि ती महत्त्वाची आहे. त्यांनी म्हटले आहे. "चित्रपट आणि नाट्य कलावंतांविषयी समाजात नेहमीच कुतूहल असते. चित्रसृष्टी अगर नाट्यसृष्टी एक महावस्त्र आहे. कलावंत हा या वस्त्रातील एक धागा आहे. कुठलाही धागा कुजका निघाला अगर कोणत्याही कारणानं तुटला तरी त्याचा परिणाम वस्त्रांची योग्यता कमी करण्यात होतो. हे व्हायला नको असेल तर

कलावंताने जीवनात कुठं थांबायचे याची लक्ष्मणरेषा अगोदर आखून घेतली पाहिजे. रसिक प्रेक्षकाची, कलावंताचं जीवन जाणून घेण्याची उत्सुकता माझ्या या आत्मचरित्राने सफल होईल अशी आशा आहे."[५२] या वाक्यातून त्यांची लेखनामागची भूमिका स्पष्ट होते.

वरील विवेचनातून आपणास "धाकटी पाती" या आत्मलेखना-पाठीमागच्या खालील प्रेरणा दिसून येतात -

१) शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांनी आठवणी लिहिण्याबद्दल दिलेली प्रेरणा.

२) बापू वाटवे, अनंत अंतरकर, श्री. वर्दे यांनी अनुभव लिहिण्यास दिलेली प्रेरणा.

३) लेखन करताना विरंगुळा म्हणून झालेला आनंद.

४) समाजात कलावंताविषयी कुतूहल असते. कलावंताचे जीवन जाणून घेण्याविषयी उत्सुकता असते. रसिकांची ती इच्छा पूर्ण करावी ही यातील सर्वात महत्वाची प्रेरणा.

कौटुंबिक जीवन चित्रण :

श्री. सूर्यकांत मांडरे यांच्या "धाकटी पाती" या आत्मचरित्रातून त्यांच्या ६० वर्षांच्या जीवनाचे दर्शन घडत असले तरी या प्रकरणात आपण त्यांचे बालपण त्यांचे शिक्षण बालपणात झालेले संस्कार यांचा ओझारता

परामर्श घेऊन त्यांच्या संबंध आयुष्यातील कौटुंबिक जीवनाचा परामर्श घेणार आहोत. कारण बालपणातील फारशा घटना नाहीत आणि शिक्षणाबद्दलही फारशा महत्त्वाच्या घटना नाहीत. परंतु कौटुंबिक जीवनाच्या बाबतीत मात्र त्यांच्या वैयक्तिक जीवनातील अनेक महत्वाच्या घटनांचे या आत्मचरित्रातून आलेले उल्लेख "एक माणूस" म्हणून त्यांच्या व्यक्तित्वाचे विलोभनीय दर्शन घडवितात म्हणून त्याचाच अधिक परामर्श घेणे योग्य ठरेल.

## बालपण व शिक्षण :

बालपणात सूर्यकांत हे थोडेसे हूड स्वभावाचे होते. आई, वडील आणि भाऊ (दादा चंद्रकांत) यांच्याविषयी त्यांच्या मनात कमालीचा आदर आणि भीती या दोन्ही भावना असल्याचे चित्र "शैशव" या प्रकरणातून जाणवते. या कालखंडात त्यांनी व्यायामाकडे अधिक लक्ष दिले. कारण वडीलांना आपल्या मुलानी व्यायाम करावा, शरीरसौष्ठव राखावे असे फार वाटे. मांडरे यांना वडीलांविषयी भक्ती व आदर असल्याने त्यांनी व्यायामाकडे अधिक लक्ष दिले. म्हणून त्यांनी म्हटले आहे, "माझ्या शरीराला हळूहळू वळण येऊ लागलं आणि आजही या गोष्टीचा फायदा मी घेतो आहे. शरीरसौंदर्य आणि तेही निकोप असणं याच्यासारखी श्रीमंती दुसरी नाही."[५३] शाळेत शिकत असतानाच सूर्यकांतांचे भाऊ चंद्रकांत हे एका कार्यक्रमासाठी

पाहुणे म्हणून आले. त्यावेळी त्यांनी काही विनोदी नकला करुन दाखविल्या आणि त्या सर्वांचा समारंभासाठी जमलेल्या लोकांवर प्रभाव पडला. सर्वांनी चंद्रकांतांचे कौतुक केले. यावेळी सूर्यकांतांच्या मनात अभिनयाचे बीज पडले. त्यांनी म्हटले आहे. "एका फिरत्या वैदूची आणि एका खेडवळ माणसाची, अशा नकला पाहून मुलं खूपच हसली. यानंतर हेडमास्तरांनी चंद्रकांतना फुलाचा गुच्छ देऊन .......... हा सर्व कार्यक्रम पाहत असताना माझ्या मनात एक विचाराचं वलय निर्माण होत होतं........... आज शाळेनं त्यांचे कौतुक केलं. मग मी असं काही केलं तर ? - ठरलं, आपण ही दादांच्यासारखं व्हायचं !"[५४] या अभिनयाच्या आकर्षणामुळे सूर्यकांतांचं अभ्यासाकडे दुर्लक्ष होत होतं. ते वर्गात नेहमी नकला करुन दाखवीत आणि त्या चांगल्या असतं. त्यामुळे शाळेच्या एका समारंभात त्यांना नाटकात जरासंधाची भूमिका मिळाली. ती त्यांनी खूप चांगली केली की नटसम्राट बालगंधर्व यांच्या हस्ते त्यांना एक "मेडल" बक्षीस म्हणून मिळाले. याचा एक परिणाम असा झाला की त्यांनी म्हटल्याप्रमाणे- "बक्षीस मिळालं तशी नाटकाची आवड निर्माण झाली".[५५] सूर्यकांतांनी नाटकाची पुस्तके वाचायला सुरुवात केली मात्र भाऊ चंद्रकांत यांना ही गोष्ट आवडली नाही कारण प्रतिकूल परिस्थितीमुळे त्यांना शिक्षण घेता आले नाही. म्हणून त्यांना वाटायचे की आपला भाऊ सूर्यकांत याने तरी शिकावे. चंद्रकांताना शिक्षणाची आवड तर सूर्यकांताना नाटकाची. यातील नाट्यविरोध त्यांनी साध्या परंतु प्रभावी शब्दात सांगितला आहे.

त्यांनी लिहिले आहे - "परिस्थितीनं त्यांना शिकता आलं नाही. पण मी शिकावंअसं त्यांना खूप वाटायचं. माझ्या मनात त्या वेळी हे विचार कधीच आले नाहीत. उलट दादांच्याविषयी वाटायचं. की, स्वत: मात्र सिनेमात काम करतात; आणि मी नाटकात काम केलेलं यांना आवडत नाही."[५६]

## बालपणातच चित्रपटात संधी :

शालेय शिक्षण घेता असताना नाटकाचे केलेले वाचन आपले भाऊ चंद्रकांत यांच्याप्रमाणे नक्लातून केलेले अभिनय यामुळे त्यांच्यात अभिनयाची एक जाणीव निर्माण झाली. याचा परिणाम असा झाला की राजाभाऊ पंडित, यांनी "प्रभात चित्र" च्या "बालध्रुव" चित्रपटात "विष्णू" च्या भूमिकेसाठी सूर्यकांताची निवड केली. चित्रपटात काम करण्याचा त्यांचा हा पहिला अनुभव. ही त्यांची भूमिका चांगली वठली.

चंद्रकांतांचे लग्न झाल्यानंतर बाळासाहेब गजबर यांच्या मदतीने त्यांना काही पिक्चर्स मिळाली. त्यामुळे त्या पिक्चर्सच्या शुटींगसाठी त्यांना पुण्यात राहणे आवश्यक होतेत्यामुळे त्यांनी सूर्यकांतला बोर्डींगांत ठेवण्याचा निर्णय घेतला. कारण नवा संसार आणि पुण्याचे शुटींग यामुळे त्याच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष व्हायला नको असे त्यांना वाटले. बोर्डींगच्या कडक आणि शिस्तमय जीवनात नाटक आणि सिनेमाची आवड असणाऱ्या सूर्यकांतांची कुचंबणा होऊ लागली. पण तरीही त्यातूनही त्यांनी तोडकर मार्ग काढला.

त्यावेळी गाजत असलेला "ब्लड अँड सॅण्ड" हा इंग्रजी चित्रपट पाहण्यासाठी त्यांनी आणि त्यांच्या मित्रांनी मास्तरांची नजर चुकवून बोर्डिंगच्या बाहेर पलायन केले. परंतु त्यांच्या या कटाचा मास्तरांना सुगावा लागला आणि छडीची शिक्षा सूर्यकांतांनी भोगली.

प्राथमिक शिक्षणानंतर ते कोल्हापूरच्या प्रायव्हेट हायस्कूलमध्ये दाखल झाले. या हायस्कूलच्या गॅदरिंगमध्ये आचार्य अत्रे यांच्या "वंदे मातरम्" या नाटकात "सदानंद" या बालनायकाची भूमिका सूर्यकांतांना मिळाली. ती त्यांनी चांगली वठवली. याच कालखंडात एका रविवारी ते आपले भाऊ चंद्रकांत यांचे शूटिंग पाहण्यासाठी स्टुडिओत गेले. भालजी पेंढारकर यांच्या "बहिर्जी नाईक" या ऐतिहासिक चित्रपटाचे शूटिंग होते. तेथे असलेल्या सूर्यकांतांकडे पाहिल्यानंतर भालजींनी त्यांची चौकशी केली. माहिती विचारली. तेंव्हा सूर्यकांतांनी मोठ्या धीटपणाने उत्तरे दिली. भालजींना सूर्यकांतांची "फिगर" आणि संभाषण आवडले आणि त्या चित्रपटातील छोट्या शिवाजीच्या भूमिकेसाठी भालजींनी सूर्यकांताची निवड केली. त्यावेळी भालजींचे उद्गार फार महत्त्वाचे आहेत. ते म्हणाले " या मुलाची फिगर आणि वय मला हवं तसं आहे. माझा शिवाजी मला मिळाला."[५७] याप्रसंगाचे वर्णन करताना सूर्यकांतांनी काढलेले उद्गार महत्त्वपूर्ण आहे. त्यांनी लिहिले आहे. " मी बाबांचं शिष्यत्व पत्करलं.... अशा त-हेचा कलाशिक्षणाचा हा माझा जीवनातला पहिलाच प्रसंग.... बाबांसारखा गुरु मला माझ्या पुढील आयुष्यात मिळणार नाही.[५८]

या त्यांच्या उद्गारातून सूर्यकांतांना भालजींच्या विषयी वाटणारी आत्मीयता दिसून येते. "बहिर्जी नाईक" या चित्रपटातील छोट्या शिवाजीच्या भूमिकेने सूर्यकांतांनी इ.स. १९४३ मध्ये चित्रपटसृष्ठीत खा-या अर्थाने प्रवेश केला. या काळातील त्यांनी दिलेली एक आठवण मोठी अर्थपूर्ण आहे. ती भालजींच्या बद्दल. शूटींगच्या वेळी भालजींनी सूर्यकांतला सांगितले, " हे बघां, तुझ्या अंगावर जेंव्हा हे महाराजांचे कपडे असतील, तेंव्हा तू वाकून कुणालाही - मलादेखील - नमस्कार करायचा नाही. आम्ही तुला नमस्कार करू. त्यावेळी तू तुझा उजवा हात वर मानेजवळ घ्यायचा."[५१] भालजींचा हा सल्ला त्यांनी आयुष्यभार पाळला. पुढे मोठे झाल्यानंतर शिवशाहीवर निघालेल्या चित्रपट आणि नाटकात भूमिका करताना सूर्यकांतांनी शिवाजींचा पोषाख अंगावर असताना कुणालाही नमस्कार केला नाही. यातही सूर्यकांतांची शिवभक्ती दिसते. याच चित्रपटाच्या वेळी भालजींनी सूर्यकांत असे त्यांचे नामकरण केले. कारण त्यांचे मूळचे नांव वामन होते. या चित्रपट शूटींगच्या वेळी त्यांना चित्रपटसृष्ठीतील अनुभव मिळाला. परंतु शिक्षणाकडे दुर्लक्ष झाल्याने मॅट्रीकच्या परीक्षेत त्यांना यश मिळाले नाही. त्यामुळे त्यांचे शिक्षण थांबले. सूर्यकांतांना आपण नाटक सिनेमात काम करावे असे वाटू लागले. त्यावेळी आपण भालजींच्याकडे मिळेल ते काम करावे आणि चार पैसे मिळवावे असे त्यांना वाटले. म्हणून

त्यांनी भालजींकडे शब्द टाकला. परंतु ज्या सिनेमा कंपनीत आपण कलावंत म्हणून काम केले तिथे नोकर म्हणून काम करणे योग्य ठरेल काय ? या विचाराने ते अस्वस्थ झाले. अशा वेळी सूर्यकांतांच्या मनात जो संघर्ष निर्माण झाला त्याचे त्यांनी अत्यंत सुंदर व अर्थपूर्ण वर्णन केले आहे. त्यांनी त्यावेळी आपल्या मनाला समजावले, "बा मना, आताच तू मानापमानाचा विचार करू लागलास, तर तुझ्या आयुष्याचं ध्येय तू कधीच गाठू शकणार नाहीस. तुझं नशीब तुलाच घडवलं पाहिजे. स्वत:च्या कर्तबगारीवर तू उभा राहावास अशी तुझ्या दादांची इच्छा आहे ना ? मग विचार कसला करतोस ? अरे, मानातल्या खोट्या कल्पना काढून टाक. यावेळी तू चंद्रकांतचा भाऊ नाहीस असं समज. एक सामान्य कलाकार - कामगार आहेस, आणि चंद्रकांत हे तुझे आदर्श आहेत. त्यांच्याइतकं तुला मोठं व्हायचं आहे आणि त्याकरिता कष्ट हे केलेच पाहिजेत !"[60] सूर्यकांतांच्या या उद्गारात ध्येयासक्ती, दृढनिश्चयता आणि स्वाभिमान या गुणांचे दर्शन घडले. भालजींच्या स्टुडिओत त्यांनी कॅमेरा डिपार्टमेंट-मध्ये काम करायचे ठरवले. आर्टिस्ट म्हणून काम केलेले असताना नोकर म्हणून हे काम स्वीकारल्याबद्दल भालजींनी जेव्हा त्यांना विचारले तेव्हा त्यानी दिलेले उत्तरदेखील सूर्यकांताच्या स्वभावावर प्रकाश टाकते. भालजींना त्यांनी सांगितले " आता माझं शिक्षणही थांबलं आहे. तेंव्हा नुसतं दोन वेळ जेवून दिवस काढणं मला पसंत नाही, माझ्या पुढील

आयुष्याच्या दृष्टीने मला काहीतरी शिकलं पाहिजे. काम केलं पाहिजे. दादांचं ठीक आहे, पण त्यांच्या आधारानं मी किती दिवस राहायचं, हे मलाच ठरवलं पाहिजे. नाहीतरी माझं आयुष्य मलाच घडवलं पाहिजे."[61] इथेही त्यांच्या स्वाभिमानी वृत्तीचा प्रत्यय येतो. याचठिकाणी त्यांची राजा परांजपे यांच्याशी ओळख झाली. त्यांनी सूर्यकांतचा हात बघून भविष्य सांगितले - " तुझं लग्न १९४७ साली निश्चित होणार आहे. तसंच तू पुढं डायरेक्टरही होणार आहेत."[62] राजा परांजपे यांनी सांगितलेल्या भविष्याचा त्यांना पुढे प्रत्यय आला.

बाबा गजबर यांनी याच वेळेला त्यांच्या एका मित्राची मुलगी सूर्यकांतसाठी वधू म्हणून ठरविली, त्यांना होकार दिला. पण त्यांना वाटत होते की आपण अजून कमावत नाही तर लग्न का करावे. परंतु जर नकार दिला तर बाबांनी आपल्या मित्राला दिलेल्या शब्दाचा अपमान होईल. म्हणून सूर्यकांतांनी आपली इच्छा नसतानाही बाबांच्या आदरापोटी त्यांना सांगितले - "बाबा, माझा निर्णय मी तुम्हाला सांगतो. तुमचा शब्द खरा झाला पाहिजे...... मी पूर्ण विचार केला आहे. आता झालं तर याच मुलीशी लग्न होईल नाहीतर नाही. यातच तुम्ही काय ते समजा !"[63] बाबांच्या आदरापोटी सूर्यकांतांनी त्यांच्या मित्राची मुलगी सुशीला हिला पसंत केले. सुशीलेलाही सूर्यकांत पसंत होते.

म्हणून मोठ्या धाडसाने तिने सूर्यकांतांना त्यासंबंधी पत्र लिहिले. यात त्यांच्या भावी पत्नीचे साहस दिसून येते. एका मास्तराच्या मध्यस्थीने सूर्यकांत आणि सुशीला यांची झालेली भेट या प्रसंगाचे सूर्यकांतानी केलेले वर्णन त्या दोघांच्या स्वभावावर प्रकाश टाकते. सूर्यकांतांनी सुशीलेला आपल्या परिस्थितीची आणि स्वभावाची कल्पना दिली. ते म्हणाले "तुम्ही तुमच्या घरी लाडात वाढला आहात. पण लग्नानंतर तुमचे हे लाड पुरवले जातीलच असं नाही, कारण माझा स्वभाव थोडा जिद्दी आहे. माझ्या संसाराकरता किंवा तुमचा हट्टपुरवण्याकरता मी माझ्या दादांच्याकडे पैसे मागणार नाही. मला जे माझ्या कमाईचे मिळतील आणि त्यातून जे काही करता येईल ते मी करीन. आणि स्त्रीस्वभावानुसार दागिने, भारी पातळं, वेळोवेळी सिनेमा पहाणं हे न मिळाल्यानं तुमच्या मनाला समाधाना-ऐवजी दु:ख मात्र होईल."[६४] याप्रसंगी सुशीलेने दिलेले उत्तर तिच्या स्वभावातल्या अत्यंत महत्त्वाच्या गुणाचे दर्शन घडविले ती म्हणाली "तुम्ही विचारलेल्या सर्व प्रश्नाचे उत्तर म्हणून एकच सांगते, तुम्ही जसं ठेवाल, सांगाल, त्या परिस्थितीत मी संसार गोड करीन. माझ्यावर विश्वास ठेवा."[६५] हे उत्तर अर्थपूर्ण आहे. कारण सूर्यकांतांच्या पुढील जीवनात त्यांच्या या भावी पत्नीचे वर्तन या शब्दांप्रमाणे दिसून येते. अनेक अडचणी आल्या, गैरसमज निर्माण झाले तरी या दोघांनी लग्न करण्याचा निर्णय घेतला आणि एक वर्षानंतर "लग्नाचा घोळ" नाहीसा होऊन २६ डिसे. १९४७ ला

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR
BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

त्या दोघांचे लग्न झाले. आणि राजा परांजपे यांनी सांगितलेले भविष्य खरे ठरले.

सूर्यकांत आणि सुशीला यांचे पती आणि पत्नीचे संबंध हे कमालीचे आदर्शवत असल्याचे चित्रण या आत्मचरित्रातून दिसून येते. सूर्यकांतसारख्या एका श्रेष्ठ कलावंताच्या जीवनात त्यांच्या पत्नीने दिलेली साथ ही वैशिष्ट्यपूर्ण आहे. कलावंताचे जीवन हे धाकाधकीचे, यश-अपयशाचे असते. सुखदु:खाचे अनेक चढउतार त्यांच्या जीवनात असतात. पण त्यांच्या पत्नीने सर्व प्रसंगी त्यांना समर्थ साथ दिल्याच्या अनेक घटना या आत्मचरित्रात आल्या आहेत. त्या घटना पाहिल्या की सूर्यकांतांची पत्नी सुशीला ही एक आदर्श, ध्येयनिष्ठ आणि कर्तबगार पतिव्रता वाटते.

अनंत माने यांनी आपल्या चित्रपटात काम करण्यासाठी सूर्यकांतांना पुण्यास बोलाविले. चित्रपटात अभिनेता म्हणून काम करण्याची सूर्यकांतांची जबरदस्त इच्छा. परंतु पुण्याला जायला सूर्यकांतजवळ पुरेसे पैसे नव्हते. अशा वेळी सुशीला "लग्नापूर्वी साठविलेले पैसे" त्यांना खर्चासाठी देते. याच वेळी त्यांना पहिला मुलगा झाला; मुलाच्या जन्मवेळीच त्यांना चित्रपटात जायची संधी मिळाली. हा मुलाचा जणू पायगुण अशीच एक घटना दुसऱ्या मुलाच्या जन्माच्यावेळी घडली. अनंत माने यांनी "बाळा जो जो रे" या चित्रपटात त्यांना हिरोची भूमिका दिली. मुलांच्या जन्माच्या वेळीच

सूर्यकांतांना चित्रपटात महत्त्वाच्या भूमिका मिळतात. हा त्यांच्या आयुष्यातील एक महत्त्वाचा योगायोग. हा योगायोग तिसऱ्या मुलाच्या जन्माच्या वेळीही आला. म्हणून त्यांनी म्हटले आहे, "योगायोग असा की प्रत्येक मुलाच्या वेळी माझ्या जीवनाला अशी काही कलाटणी मिळत गेली की त्यामुळे माझी जिद्द महत्वाकांक्षा वाढत गेली."[66]

सूर्यकांतांच्या जीवनात त्यांच्या पत्नीचे अत्यंत महत्वपूर्ण स्थान आहे. कलावंतांच्या अस्थिर जीवनाचा संसार स्थिर करण्यात या स्त्रीचे अत्यंत महत्वपूर्ण योगदान आहे. स्वतंत्र संसार उभा केल्यावरसुध्दा मुलांचे संगोपन आणि शिक्षण करण्यात आपल्या कलावंत पतीला धीर व प्रेरणा देण्यात त्यांच्या पत्नीने जे औदार्य आणि धैर्य दाखविले ते खरोखरीच असामान्य आहे म्हणून सूर्यकांतांनी आपल्या पत्नीचा या आत्मचरित्रात अत्यंत गौरवाने आणि कृतज्ञतेने उल्लेख केला आहे त्यांनी म्हटले आहे - "आणि खऱ्या अर्थाने मला सहकार्य दिले असेल तर ते माझ्या पत्नीने । तिची साथ जर नसती तर माझ्या मनातली स्वप्ने मी पुरी करू शकलो नसतो...... संसारात येणाऱ्या अडचणींना तितक्याच खंबीरपणाने सामोरे जाण्याचे धैर्य तिच्यात निश्चितच आहे. नाहीतर माझ्यासारख्या सिनेसृष्टीत वावरणाऱ्या कलावंताबरोबर संसार करणे अवघडच । अहो, नोकरीची शाश्वती नाही. मिळणारा पैसा चैनीत खर्च केला असता तर कोण विचारणार होतं ? पण त्याला आवर घातला तो तिनं ।

म्हणूनच आज मी सुखी जीवन जगू शकलो आहे." [६७] स्वतःच्या पत्नीविषयी सूर्यकांतांना वाटणारा अभिमान वैशिष्ट्यपूर्ण आहे. स्वतःचे स्वतंत्र घर बांधताना, आपल्या मुलाची लग्ने ठरविताना बरीचशी जबाबदारी त्यांच्या पत्नीनेच उचलली. या पत्नीच्या प्रेमामुळेच सूर्यकांतांनी तिच्या माहेरच्या माणसांची जबाबदारीही स्वीकारली. सूर्यकांतांच्या सासऱ्यांचे त्यांच्यावर खूप प्रेम आणि विश्वास म्हणून मृत्यूच्या अखेरच्या वेळी त्यांनी आपल्या मुलांची सारी जबाबदारी त्यांच्यावर सोपविली आणि सूर्यकांतांनीही ती जबाबदारी अत्यंत प्रामाणिकपणे पार पाडली. आपल्या मेहुण्यांचे जीवन सुरळीत सुरू व्हावे. आपले मेहुणे मार्गी लागावेत म्हणून त्यांनी खूप प्रयत्न केले. या प्रकरणात त्यांना मनस्ताप व अपमान सहन करावा लागला. आणि तो त्यांनी सहन केला. आपल्या माहेरच्या माणसांमुळे आपल्या पतीला त्रास होत आहे, ही गोष्ट सुशीलेच्या मनाला लागून राहते. आणि त्यावेळी ती आपल्या माहेरच्या माणसांपेक्षा आपल्या पतीला अधिक मानते. तिच्या भावाने सूर्यकांतांच्या विरुद्ध कोर्ट केस केली त्या प्रकरणात ती भावांना स्पष्टपणाने सांगते- "यापुढं माहेरचा व माझा काहीही संबंध नाही, माझ्या पतीचा अपमान तोच माझा ! तुम्हाला भाऊ म्हणायला लाज वाटते मला. कृतघ्न आहात तुम्ही." [६८] सुशीलेच्या या कठोर उद्गारात तिचा स्वाभिमान आणि पतीवरचे उत्कट प्रेम दिसून येते. "खाकटी पाती" या आत्मचरित्रात सूर्यकांतांनी ज्या व्यक्तींची चित्रे

रेखाटली आहेत त्यापैकी एक हृदयस्पर्शी उत्कट आणि भावपूर्ण व्यक्तीचित्र म्हणजे त्यांच्या पत्नीचे. अनेक प्रसंगातून असे दिसून येते की, सूर्यकांतचे आपल्या पत्नीवर कमालीचे उत्कट प्रेम. ती त्यांच्या जीवनाची प्रेरणा होती. स्फूर्ती होती. आधार होता. म्हणूनच बाबासाहेब पुरंदरे यांनी गौरवोद्गार काढले आहेत. "सूर्यकांत मांडरे यांची अगदी खरोखुरी नायिका आहे. त्यांची पत्नी सौ. सुशीला सूर्यकांत !"[६१]

<u>प्रेमळ परंतु व्यवहारी भाऊ - चंद्रकांत :</u>

सूर्यकांतांच्या जीवनात त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर प्रभाव पाडणारी महत्त्वाची व्यक्ती म्हणजे त्यांचे थोरले बंधू चंद्रकांत मांडरे. आपल्या आत्मचरित्रात त्यांनी त्यांचा अत्यंत गौरवपूर्वक व अभिमानपूर्वक उल्लेख केला आहे. चंद्रकांत मांडरे हे त्यांचे बंधू असले तरी ते स्वभावाने अत्यंत जडक, व्यवहारी होते. सूर्यकांत लहान असताना ते चित्रपटात काम करत होते. आपले थोरले भाऊ चित्रपटात काम करतात याचा सूर्यकांतांना अभिमान होता. म्हणून त्यावेळी त्यांनी आपल्यासमोर त्याचा आदर्श ठेवला होता. ते ज्या शाळेत शिकत होते त्या शाळेत ते एका कार्यक्रमाच्या-वेळी पाहुणे म्हणून आले तेव्हा त्यांनी त्यावेळी केलेल्या भाषणाचा आणि त्यांनी करून दाखविलेल्या नकलांचा बाल सूर्यकांतवर प्रभाव पडला. यासंदर्भात त्यांनी म्हटले आहे, " आज शाळेनं त्याचं कौतुक केलं मग मी असं काही केलं तर ?

ठरलं आपणही दादांच्यासारखा व्हायचं !"[७०] चंद्रकांतांची तळमळ होती की आपणाला शिकता आलं नाही. तरी आपल्या भावाने खूप शिकावं पण सूर्यकांतांना मात्र आपल्या भावाप्रमाणे नाटक, सिनेमात काम करावे असे वाटत होते. म्हणून चंद्रकांत सूर्यकांतांच्या शिक्षणाकडे अधिक लक्ष देत होते. त्यासाठी त्यांनी सूर्यकांताचे चांगले शिक्षण व्हावे म्हणून त्यांना बोर्डिंगमध्ये ठेवले. भालजींनी "बहिर्जी नाईक" या ऐतिहासिक चित्रपटासाठी बाल शिवाजींच्या भूमिकेसाठी सूर्यकांतांची निवड केली तेव्हा मात्र चंद्रकांतांनी विरोध केला नाही. परंतु सूर्यकांतांना "चित्रपटातल्या कामामुळं शाळेकडं दुर्लक्ष करू नकोस."[७१] असा उपदेश केला, कारण त्यांना माहित होते की सिनेमा आणि नाटक यावर माणसाला भवितव्य ठरविता येत नाही. कारण या दोन्ही क्षेत्रात दुसऱ्यावर अवलंबून राहावे लागते. तरीही सूर्यकांतांची आवड पाहून त्यांनी-त्यांना काम करण्यास परवानगी दिली. पण इशारा दिला "कंपनीत बाकीच्या गोष्टीपासून सांभाळून राहयचं. माझ्या कानावर वाईट गोष्ट येता कामा नये."[७२] त्यावेळी सूर्यकांतांनी आपल्या भावाला दिलेले उत्तर अर्थपूर्ण आहे. " दादा, याबाबत माझ्यावर विश्वास ठेवा. गैरसमज करून घेऊ नका. मी चांगला वागेन व कांहीतरी काम करेन, शिकेन, पैसे मिळवेन पण संधी मिळाली पाहिजे."[७३]

सूर्यकांतांचे लग्न झाल्यानंतर चंद्रकांतांनी घराची वाटणी करण्याचे ठरविले तेव्हा सूर्यकांतांना फार वाईट वाटले. चंद्रकांतांबद्दल

त्यांचा थोडासा गैरसमजही झाला कारण चंद्रकांतांवर त्याचे आईवडीलां-एवढेच प्रेम होते. या आंत्यतिक प्रेमामुळेच ते दुखावले गेले. त्यासंदर्भात त्यांनी लिहिले आहे - "मी मात्र दादांना माझं सर्वस्व द्यायला तयार होतो. आईवडीलांच्या ठिकाणी मी त्यांना मानीत होतो - आजही मानतो. त्यांच्या सुखाकरता करता काहीतरी करावं हीतळमळ माझ्या अंत:करणात सदैव जागृत आहे. जे प्रेम भरत-लक्ष्मणानं आपल्या रामावर केलं, तोच आदर्श माझ्या अंत:करणात रूजलेला आहे. त्यावेळी मात्र या व्यवहारी जगात आम्हा दोघा भावामध्ये एक कायदेशीर कागद झाला खरा."[७४] परंतु वाटणी करण्यात चंद्रकांतांचा वाईट हेतू नव्हता. आपल्या भावाने स्वावलंबी व्हावे. परावलंबी राहू नये. अशी त्यांची इच्छा होती म्हणूनच पुढे त्यांनी सूर्यकांतांना सांगितले - " वामन, मी तुला जे सांगणार आहे, त्याचं वाईट वाटून घेऊ नकोस सध्या तुला कामं बरी आहेत. तुझी आर्थिक परिस्थितीही सुधारली आहे. याचा मला आनंदच आहे. तुझी प्रगती व्हावी म्हणून मी तुला स्वतंत्र राहायला सांगणार आहे. तुला तुझ्या खर्चाचा अंदाज यायला हवा. तू स्वत:: काही तरी करून दाखवावंस अशी माझी इच्छा आहे"[७५] चंद्रकांताने स्वतंत्र बि-हाड करण्याविषयी सुचविले तरी त्यांना दूर लोटले नाही म्हणून आपल्या घराजवळचीच जागा त्यांना राहण्यासाठी उपलब्ध करून दिली. यात त्यांचा व्यवहार आणि प्रेम या दोन्ही गोष्टी दिसून येतात. चंद्रकांत व्यावहारीक असले तरी

भावशील असलेल्या सूर्यकांतांनी आपल्या थोरल्या भावाबद्दल नेहमीच आदर दाखविला. विश्वास ठेवला. म्हणूनं तर त्यांनी चंद्रकांतांचा एकसष्ठावा वाढदिवस थाटात साजरा करण्याची योजना आखली. परंतु चंद्रकांतांना असा जाहीर समारंभ नको होता. तरीही सूर्यकांतांच्या मनातील तळमळ पाहून त्यांनी शेवटी संमती दिली. यासंदर्भात सूर्यकांतानी चंद्रकांतांना लिहिलेले पत्र मोठे अर्थपूर्ण आहे. त्या पत्रातून सूर्यकांतांच्या मनातील भावनात्मकता आणि उदारता व्यक्त होते. त्या पत्रात त्यांनी लिहिले आहे, " मी तुम्हाला पितृस्थानी मानत आलो. आणि यापुढेही तीच भावना माझ्या अंत:करणात राहील.... तुमचा आदर्श माझ्या जीवनात दीपस्तंभ. माझ्या जीवन नौकेला लाभला नसता तर ही नौका एखाद्या खडकांवर आदळून फूटून गेली असती याची जाणीव ठेवून मी दीपस्तंभाची पूजा करणे चूक आहे का ?...... हे सर्व वाचून तुम्ही मला वेडा म्हणाल पण खरंच मी वेडा आहे. माझं प्रेम वेडं आहे, भावना वेड्या आहेत. स्वप्नसृष्टीत वावरणारा तुमचा वामन खरंच वेडा आहे....... पाठीशी भावाचा डोंगराएवढा आधार घेऊन माझ्या जीवनाचा आदर्श मी चालत राहिलो. दादा, तुम्ही मला वडिलांच्या ठिकाणीच आहात. म्हणून म्हणतो, यापुढे तुम्ही रोज चांदीच्या ताटात जेवण जेवावं, अशी माझी इच्छा आहे......... तुमच्या वामनने केलेली ही पूजा स्वीकारालं ना ?"[76] सूर्यकांतांचे चंद्रकांतावर

असलेले हे बंधुप्रेम किती उत्कट आहे हे या पत्रातून दिसून येते. चंद्रकांतांचे सूर्यकांतांवर अतोनात प्रेम होते. परंतु त्यांच्या स्वभावातील व्यावहारीक वृत्तीमुळे त्या प्रेमाला भावनात्मकतेची झालर लाभली नव्हती एवढेच. मात्र एके ठिकाणी चंद्रकांतांच्या या भावनात्मकतेचे सूर्यकांतांनी सुंदर वर्णन केले आहे. आपली पत्नी सुशीला हिची प्रकृती दाखविण्यासाठी सूर्यकांतांनी एका चित्रपटाच्या शूटींगच्यावेळी तिला मुंबईला नेले. तेथे एका चांगल्या डॉक्टरकडून तिचे ऑपरेशन करुन घेतले. ही बातमी त्यांनी चंद्रकांतांना कळविली. त्यावेळी व्यावहारिक असणाऱ्या चंद्रकांतांनी भावपूर्ण शब्दांत लिहिले - "वामन, (सूर्यकांत) आपलं रक्ताचं नातं, व यापेक्षाही आपण एकमेक खूपच भावनाप्रधान आहोत. हे आपल्या तीं. बाबा व तीं. आईच्याकडून आपणास मिळालेली देणगी आहे. - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

बाकी सर्वजण जरी असले तरी तू हक्काने आम्हाला बोलावण्यातच धारा अर्थ होता. अशाच प्रसंगी घऱ्या अर्थाने आपण एकमेकांच्या पाठीशी राहून साहाय्य व धीर देऊ शकतो."७७ आणि न मागता चंद्रकांतांनी सूर्यकांतांना दोन हजार रुपये पाठवून दिले. चंद्रकांतांचे बंधुप्रेम या प्रसंगातून दिसून येते. याचा एक पुरावा म्हणजे सूर्यकांतांची टी.व्ही.वर मुलाखात झाली असता त्यांनी आपले आई, वडील, भाऊ यांच्याविषयी अत्यंत कृतज्ञतेचे उद्गार काढले. ती मुलाखात पाहून आणि ऐकून कु. सुप्रिया

लोटणकर नावाच्या एका मुलीने पत्र लिहिले - "आपले आचार, विचार, बंधुप्रेम याचा आमच्या घरात एवढा परिणाम झाला की, माझे दोन भाऊ आहेत, ते एकमेकांशी तुसडेपणाने वागत, परंतु आपली मुलाखात बघितल्यावर त्यांच्या मनावर मोठा परिणाम झाला व त्यांनी आईवडीलांजवळ कबूल केले की, आम्ही यापुढे भाऊ-भाऊ म्हणूनच वागू."[७८] सूर्यकांत व चंद्रकांत यांच्यातील बंधुप्रेमाची ही जणू पावतीच होय. या संदर्भात या आत्मचरित्राच्या प्रस्तावनेत एका पत्रात पु.ल.देशपांडे यांनी सूर्यकांतांच्या या बंधूप्रेमाचा सार्थ शब्दात गौरव केला आहे. "तुमच्या सुदैवाने तुम्हाला चंद्रकांतांसारखा धाकटा भाऊ लाभला. पण "लाभला" एवढेच म्हणणे बरोबर नाही. तुम्ही हा भाऊपणा एखादी वेल जोपासावी तसा जोपासला. फुललेल्या वेलीचा सुगंध तुमच्या पदरात पडला. हा वेलीचा गुण तसाच वेल जोपासणा-याचाही."[७९]

प्रेमळ पुत्र :

सूर्यकांत कलावंत असले तरी त्यांचे "कलेएवढे" "घरांवर" ही प्रेम होते. आपले आई, वडील, मुले, नातेवाईक यांच्यावर त्यांचे उत्कट प्रेम होते. सूर्यकांतांचे कुटुंब प्रेम हा त्यांच्या व्यक्तित्वाचा एक महत्त्वपूर्ण पैलू वाटतो. पत्नी सुशीला, भाऊ चंद्रकांत, यांच्याविषयीच्या त्यांच्या भावना किती उत्कट आणि प्रामाणिक होत्या याची वर चर्चा केली आहेच. पण त्याशिवाय कुटुंबातील इतर व्यक्तींविषयी त्यांच्या मनात

प्रेम आदर, भक्ती उत्कट स्वरूपात होती याचेही दर्शन या आत्मचरित्रातून घडते.

सूर्यकांतांच्या भावजीवनात आईवडीलांचे खूप महत्त्व दिसून येते. त्यांच्या वडीलांनी सूर्यकांतांच्या अभ्यासापेक्षा व्यायामाचीच अधिक काळजी घेतली त्यांच्या भीतीमुळे का होईना त्यांनी व्यायाम केला आणि शरीरयष्टी कमावली याचा त्यांना चित्रपटसृष्टीत आयुष्यभर उपयोग झाला. वडिलांच्या आजारपणात सूर्यकांतांनी त्यांची खूपच सेवा केली. पण थोड्याच दिवसात त्यांचा मृत्यू झाला. आपले कर्तृत्व आणि वैभव वडील पाहू शकले नाहीत याची सूर्यकांतांना पुढे सतत जाणीव होत राहीली. वडिलांच्यामानाने त्यांना आईचा सहवास खूप लाभला. लहानपणी दूड असताना आईने ब-याच वेळेला सूर्यकांतांना वडीलांच्या धाकापासून वाचवले त्यामुळे सूर्यकांतांच्या मनात आईविषयी आत्मियता होती. आईची त्यांनी नेहमीच काळजी घेतली. त्यांच्या आईने आपल्या मुलाचे सूर्यकांतांचे वैभव पाहिले. आपल्या आईला आपल्या पत्नीपासून कसलाही त्रास होऊ नये याची त्यांनी नेहमीच काळजी घेतली. परदेश प्रवासाहून परत आल्यानंतर ते आईला भेटतात तेंव्हा आई ज्या ममतेने त्यांना जवळ घेते ते पाहून त्यांच्या मनात आईच्या मोठेपणाबद्दल आलेला विचार त्यांनी भावपूर्णतेने सांगितला आहे. ते म्हणतात/लिहितात - "या आईच्या प्रेमाचा साक्षात्कार मला मिळाला हे माझं भाग्यच नाही का ?

तुम्हीच सांगा, मी आता काय लहान होतो का ? माझ्या मुलाचे लग्न झाले. घरात सून आली. तरी आईच्या नजरेत मी लहानच होतो. आईच्या मायेचा मोठेपणा वर्णन करता येणार नाही. त्या प्रेमापुढे जगाची निर्मिती करणारा परमेश्वरसुद्धा लहानच आहे."[80] आईच्या आजारपणात वडिलांप्रमाणे तिचीही त्यांनी सेवा केली. आईच्या मृत्यूच्या प्रसंगाचे त्यांनी भावपूर्ण वर्णन केले आहे. त्यांनी लिहिले आहे -

" आईच्या कुशीत डोकं टेकून धायमोकलून रडलो........ मी कुशीतून मान वर केली. पण हाताला पातळाचा पदर अडकून तसाच चेह-यावर आला. माझे अश्रूच जणू त्या पुसतात असा मला भास झाला. लहानपणी असेच पदराने अश्रू पुसता पुसता म्हणायच्या, "रडू नकोस रे, वामन" हेच शब्द आज माझ्या कानात गुंजन करून गेले"[81]

<u>कर्तव्यनिष्ठ जावई :</u>

सूर्यकांतांच्या जीवनातील आणखी एक महत्त्वाची व्यक्ती म्हणजे त्यांचे सासरे - आबासाहेब. आबासाहेबांना आपल्या जावयाचा फार अभिमान वाटे. पण त्याहीपेक्षा त्यांचा सूर्यकांतांवर विश्वास अधिक होता. परंतु सूर्यकांतांनी सास-याच्या त्या प्रेमाचा कधीही गैरफायदा घेतला नाही. सास-यांनी त्यांना गरज होती म्हणून कॅमेरा घेऊन दिला. पण सूर्यकांतांनी लवकरच पैशाची परतफेड केली. सास-यांनी एकदा त्यांना

त्यांच्याकडेच कपडे शिवून घेण्याविषयी सांगितले. तेंव्हा सूर्यकांतांनी त्यांना कपड्याच्या बिलाविषयी विचारले. सास-यांनी नकार दिला. सास-यांकडून फुकट कपडे शिवून घेणे सूर्यकांतांना आवडले नाही. त्यांनी स्पष्ट शब्दात सास-यांना सांगितले " घर आणि दुकान या वेगळ्या जागा आहेत. तुम्ही तुमच्या जावयाचे लाड घरी करा. पण दुकानात व्यवहार हा सांभाळलाच पाहिजे."[२] त्यांच्या आजारपणात सूर्यकांतांनी त्यांची सेवा केली. सूर्यकांतांमुळेच औषध न घेणा-या सासरेबुवांनी औषधे घ्यायला सुरुवात केली. मात्र यावेळी त्यांनी सूर्यकांतांच्याकडून वचन घेतले की त्यांच्या माघारी त्यांच्या कुटुंबियाची, संपत्तीची व्यवस्था त्यांनी पहावी. सासरेबुवांचा आपल्या जावयावरील हा विश्वास म्हणजे सूर्यकांतांच्या व्यक्तित्वाचे एक वैशिष्ट्य म्हणावे लागेल. आबासाहेबांच्या मृत्यूनंतर सूर्यकांतांनी त्यांच्या मुलां-मुलींची बरीच काळजी घेतली. मेव्हण्यांना त्यांनी लॉजचा व्यवसाय घालून दिला. कमी पडलेले पैसे स्वत: घातले. त्यांची लग्ने केली. चित्रपटाच्या शूटींगच्या धकाधकीच्या जीवनातूनही सूर्यकांतांनी हे केले ते केवळ सास-यांना दिलेल्या वचनपूर्तीसाठी. परंतु पुढे मात्र त्यांच्या मेव्हण्यांनी त्याची जाण राखली नाही. विश्वासघात केला. याचा बराच मन:स्ताप झाला. तरीही त्यांनी आपल्या कर्तव्यात कसूर केली नाही. हे वैशिष्ट्यपूर्ण आहे. मेव्हण्यांनी व्यवसायात फसवले तरी आपल्या मेव्हणीचे लग्न जमवून दिले. पण त्याहीपेक्षा सूर्यकांतांच्या कर्तव्यनिष्ठेचे आणि वचननिष्ठेचे मनोरम दर्शन घडते ते सासूबाईंच्या मृत्यूच्या

प्रसंगी. मेव्हण्यांच्या वर्तनामुळे संबंध बिघडले असतानाही आणि त्यांच्या पत्नीचा विरोध असतानाही ते सासूबाईंच्या अंत्यदर्शनाला गेले.

प्रेमळ आणि कर्तव्यनिष्ठ पिता :

सूर्यकांतांच्या कौटुंबिक जीवनातील आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे त्यांचे आपले मुलांवरील उत्कट प्रेम. त्यांनी आपल्या चारही मुलांवर कमालच्या उत्कटपणाने प्रेम केले. आपल्या मुलांविषयी त्यांच्या मनात कमालीची आत्मियता दिसून येते. याबाबतीत योगायोगाची गोष्ट म्हणजे त्यांच्या पहिल्या दोन्ही मुलांच्या जन्माच्या वेळेला त्यांना चित्रपटात महत्त्वाच्या भूमिका मिळाल्या. आपल्या मुलांचा चांगला पायगुण अशी श्रध्दा त्यांच्या मनात निर्माण झाली. या मुलांविषयी त्यांनी खूप स्वप्ने रंगविली होती असे दिसून येते. त्यांनी खूप शिकावे, मोठे व्हावे आणि नांव कमवावे अशी त्यांची फार इच्छा होती. परंतु दुर्दैवाने त्यांची मुले फारशी शिकली नाहीत. याची खास्खा मात्र त्यांना नेहमीच जाणवत राहिली. असे असले तरी त्यांनी आपल्या इच्छा किंवा मते त्यांच्यावर लादली नाहीत हे विशेष. उलट त्यांना आवडेल ते शिक्षण त्यांनी दिले. आणि आवडतील ते व्यवसाय सुरु करण्यास मन:पूर्वकतेने मदत केली. थोरला मुलगा उदय वाईन शॉप काढण्याविषयी सुचवितो तेंव्हा सूर्यकांतांच्या डोक्यात विचारांचे मोहळ उठले. ते म्हणतात -

"दारू माझा नावडता विषय, आणि तोच धंदा मुलगा करतो असं म्हणतो, कसं पटणार मला ?"[83] पण पत्नीने सल्ला दिला, "तो स्वतंत्र व्यवसाय करतो म्हणतोय तर तुम्हीच पुढं होऊन आर्थिक मदत केली पाहिजे. धंदा कोणताही करावा, पण तो व्यवस्थित केला पाहिजे."[84] मनाला पटत नसूनही सूर्यकांतांनी प्रेमापोटी आणि कर्तव्यापोटी आपल्या मुलाला वाईन शॉप काढण्यास संमती दिलीच पण आर्थिक मदतही केली. कारण आपल्या मुलांवर त्यांचा विश्वास होता. मुलांची लग्नेही त्यांनी त्यांच्या पसंतीने करून दिली. विशेषत: या लग्नात त्यांनी कुणाकडूनही हुंडा घेतला नाही किंवा मानपानाची अपेक्षा ठेवली नाही. यात त्यांच्या मनाची उदारता दिसून येते. मुलांचे शिक्षण, व्यवसाय लग्न आणि संसार याबाबतीत सूर्यकांतांचे वागणे लक्षणीय वाटते. चित्रपटसृष्टीत वावरणाऱ्या कलावंतांचे आपल्या संसाराकडे दुर्लक्ष होते आणि त्यामुळे त्यांची मुले बिघडतात असे बहुधा दिसून येते. ही जाणीव असल्यामुळेच सूर्यकांतानी चित्रपटसृष्टीच्या धकाधकीतून मुलांकडे लक्ष दिले. आणि त्यांना त्यांच्या पायावर उभे केले. कर्तृत्ववान बनविले हे विशेष वाटते. याचाच एक परिणाम झाला की मुलांना आपल्या वडिलांविषयी कमालीचा आदर आणि अभिमान वाटे. एवढेच नव्हे तर त्यांच्या सुखासाठी सुध्दा ते झटत राहिले. याचा एक पुरावा म्हणजे आर्थिक टंचाईमुळे सूर्यकांतांना मोटारगाडी विकावी लागली. हे शल्य त्यांना बरेच दिवस जाणवत होते. हे ओळखून त्यांच्या एका मुलाने (उदय) स्वत:च्या

कर्तृत्वाने एक मोठा रागाडी घेतली.

समारोप :

सूर्यकांतांच्या "धाकटी पाती" या आत्मचरित्रात त्यांच्या सांसारिक जीवनाचे चित्रण सर्वत्र विखुरलेले आहे. त्या चित्रणात विस्कळीतपणाही आहे. परंतु या विखुरलेल्या आठवणींचे मोती कलावंत जीवनाच्या अंगणात भावपूर्णतेने चमकतात. कलावंतांच्या आत्मचरित्रातून त्यांच्या कौटुंबिक किंवा संसारिक जीवनाचे फारसे चित्रण आढळत नाही आणि जरी आढळले तरी त्यात उत्कटता आढळत नाही. सूर्यकांतांचे आत्मचरित्र याला अपवाद आहे. आपल्या कलाजीवनाइतकेच ते संसारी जीवनातही रममाण झालेले दिसून येतात. त्यामुळे त्यांच्या संसारिक जीवना चित्रणात उत्कटता जाणवते आणि सूर्यकांत या कलावंतातील एका संसारिक गृहस्थाचे व्यक्तिमत्त्वाचे विलोभनीय पैलू वाचकांचे लक्ष वेधून घेतात. म्हणूनच बाबासाहेब पुरंदरे यांनी म्हटले आहे. "आई, वडील, दादा, वहिनी, मुलं, सुना, नातवंडं, नातलगं, गुरु आणि मित्र यांच्या भावतीच मुख्यत: ही "धाकटी पाती" वावरताना दिसेल. चित्रपटसृष्टी, नाट्यसृष्टी आणि इतर लौकिक व्यापापेक्षाही हा कलावंत आपल्या आप्त-इष्ट-मित्रांच्या परिवारात पळभर जास्त रमतो. म्हणूनच या आत्मकथेत सांसारिक आणि पारिवारिक जीवनच जास्त आलं आहे.

त्यात ते रंगून गेले आहेत."[८५] आपल्या संसारिक जीवनात सूर्यकांत कमातीचे सुखी आणि तृप्त असल्याचे जाणवते. त्यांच्या वैयक्तिक जीवनाचा हा भावालेख लक्षणीय आहे.

## कलासृष्टीतील जीवन चित्रण

सूर्यकांतांच्या अभिनय कला प्रेमाची सुरुवात त्यांच्या बालपणीच झाली. आपले थोरले भाऊ चंद्रकांत चित्रपटात काम करतात हे त्यांना ऐकून माहित होते. परंतु ते ज्या शाळेत प्राथमिक शिक्षण घेत होते त्या शाळेच्या वाढदिवसानिमित्त त्यांचे बंधू चंद्रकांत पाहुणे म्हणून आले होते. त्याप्रसंगी त्यांनी मुलांच्या समोर काही नकला करुन दाखविल्या त्यांचे सर्वांनी कौतुक केले या संदर्भात आठवण सांगताना त्यांनी लिहिले आहे. "आज शाळेनं त्याचं कौतुक केलं. मग मी असं काही केलं तर ? ठरलं, आपणही दादांच्यासारखं व्हायचं !......... या विचारांची ठिणगी पडली; आणि माझं अभ्यासातून लक्ष उडालं."[८६] आपल्या भावाप्रमाणे सूर्यकांतही शाळेच्या वेगवेगळ्या कार्यक्रमात नकला करु लागले आणि त्यांचं कौतुक होऊं लागलं. याचवेळेला शाळेतल्या एका नाटकात चांगले काम केले म्हणून त्यांना नटसम्राट बालगंधर्व यांच्याकडून "मेडल" मिळालं म्हणून त्यांनी म्टले आहे "बक्षिस मिळालं तशी नाटकाची आवड निर्माण झाली."[८७] सूर्यकांतांच्या मनात अभिनयाची आवड निर्माण झाली. याच वेळेला "प्रभात चित्र" चे राजाभाऊ पंडित हे "बालध्रुव" या चित्रपटात लहान मुलांच्या भूमिका मिळविण्यासाठी आले आणि त्यांनी सूर्यकांतांची "विष्णू"च्या भूमिकेसाठी निवड केली. चित्रपटात काम करण्याचा

त्यांचा पहिलाच प्रवेश आणि अनुभव. दादांच्या (चंद्रकांत) मुळे त्यांना सिनेमाची आवड निर्माण झाली. आई, वडील, दादा, शिक्षक यांना चुकवून ते चित्रपट बघू लागले आणि त्याबद्दल शिक्षाही भोगली.

पुढे हायस्कूलमध्ये गेल्यानंतर आचार्य अत्रे यांच्या "वंदेमातरम्" या नाटकात "सदानंद" या खलनायकाची भूमिका केली. चंद्रकांतचे शूटींग पाहायला गेले असता भालजींनी चंद्रकांतांचा भाऊ असलेल्या सूर्यकांतांना पाहिले. त्यांना "बहिर्जी नाईक" या चित्रपटात बाल बाल शिवाजी साठी मुलगा हवा होता त्यांनी सूर्यकांताची निवड करण्याचे ठरविले. त्यावेळी ते म्हणाले, "...... या मुलाची फिगर आणि वय मला हवं तसं आहे, माझा शिवाजी मला मिळाला."[८८] थोडीशी चाचणी घेतल्यानंतर त्यांनी शिवाजीच्या भूमिकेसाठी त्यांची निवड केली. ते तालमीसाठी जाऊ लागले यासंदर्भात सूर्यकांतांनी म्हटले आहे, "........कला शिक्षणाचा माझ्या हा जीवनातला पहिलाच प्रसंग.... बाबांचे शिकवणं म्हणजे माझा नाट्यचित्र क्षेत्रातला पायाच म्हणायला पाहिजे...... त्यांच्या पठडीतून मी जात होतो...... बाबांसारखा गुरु मला माझ्या पुढील आयुष्यात मिळणार नाही."[८९] याचवेळी भालजींनी त्याचे वामन मांडरे याऐवजी सूर्यकांत असे नामकरण केले. तेथूनच त्यांची चित्रपटसृष्टीत खऱ्या अर्थाने वावरायला सुरुवात झाली. त्यांना कामाबद्दल त्याना भालजींनी पैसे देऊ केले. पण ते सूर्यकांतांनी नाकारले.

यातून सूर्यकांतांच्या मनात कलाप्रेम या प्राथमिक अवस्थेतच दिसून येते. ते भालजींना म्हणाले, "बाबा मी पैशाच्या अपेक्षेनं कामं केलं नव्हतं."[१०] सूर्यकांतांच्या आरंभीच्या काळातील हा उद्गार त्यांच्या प्रवृत्तीवर प्रकाश टाकतो कारण पुढे मोठे झाल्यानंतर सुध्दा सूर्यकांतांनी "भूमिके"चा विचार केला, "पैशा"चा नाही याचे हे पहिले दर्शन घडते.

पुढे मॅट्रीकचे शिक्षण बंद झाल्यानंतर त्यांनी बाबा गजबर यांच्याकडे ड्रॉईंगचे शिक्षण घ्यायला सुरुवात केली. बाबा गजबरांच्या सहवासातही त्यांचे कलाप्रेम वाढत गेले विशेषतः नैतिकतेचा प्रभाव पडला. सूर्यकांतांच्या व्यक्तिमत्वावर प्रभाव पाडणाऱ्या दोन व्यक्ती म्हणजे भालजी पेंढारकर आणि बाबा गजबर. बाबा गजबर निर्व्यसनी आणि आस्तिक होते. संस्कारक्षम असणाऱ्या सूर्यकांतांच्या मनावर याचा फार मोठा परिणाम झाला म्हणून त्यांनी म्हटले आहे " बाबा स्वतः निर्व्यसनी असल्यानं, त्यांचा आदर्श म्हणून की काय कोण जाणे; पण ज्या वयात मुलांना व्यसन लागण्याची शक्यता असते; अशा व्यसनापासून मी मात्र दूर राहिलो. बाबांचे घरी त्यांचे मित्र (त्यांच्याच वयाचे) आले की त्यांच्या अध्यात्मावर चर्चा चालायच्या. त्या ऐकून परमेश्वरावर माझी श्रध्दा बसली. अशा रीतीनं कला व अध्यात्म या दोन्ही गोष्टींचे मनावर संस्कार होऊ लागले. माझ्या जीवनाचा यशस्वी मार्ग आखून देणारे "गुरु" म्हणून मानतो ते बाबा गजबर यांनाच !"[११] याच काळात त्यांच्या

Dr. R. G. Bidkar

Certificate

मनात फोटोग्राफीची आवड निर्माण झाली. शिक्षणात फारसा रस नसल्याने शिक्षण बंद पडल्याने त्यांनी नोकरी करायचे ठरविले; पण कलाक्षेत्रातच. म्हणून त्यांनी भालजींच्या स्टुडिओमध्ये कॅमेरा डिपार्टमेंन्ट-मध्ये काम करायचे ठरविले. "कलावंत" सूर्यकांतांनी भालजींच्या स्टुडिओत "कामगार" म्हणून नोकरी पत्करली. आरंभीच्या कालखंडात अशा प्रकारे त्यांनी कलावंत म्हणून छोट्या भूमिका केल्या ड्रॉईंगचे शिक्षण घेतले. पेन्टींग्ज काढले कॅमेरामन म्हणून काम केले आणि त्यांच्या कला जीवनाचा पाया घातला गेला.

या कालखंडात सूर्यकांत नाट्य - चित्र, फोटोग्राफी या क्षेत्रात आपले स्थान निर्माण करण्याचा प्रयत्न करताना दिसतात. या विविध कलांच्या उपासनेतून त्यांचे "कलावंत" हे व्यक्तिमत्त्व निर्माण होत होते असे आपणास दिसून येते. "कलावंत" म्हणून हा त्यांच्या जडणघडणीचा कालखंड होय. या कालखंडातल्या घटना पाहिल्या तर असे दिसून येते की त्यांचा शिक्षणापेक्षा कलेकडे अधिक ओढा होता. चंद्रकांत, भालजी पेंढारकर, बाबा गजबर हे त्यांचे या क्षेत्रातील आदर्श होते. ते त्यांचे गुरु होते. त्यांचा आदर्श समोर ठेवून सूर्यकांतांनी आपल्या कलागुणांचा विकास केला. कलेची उपासना केली. त्यासाठी अनेक प्रसंगी उपेक्षा, मानहानी, वरिष्ठांचा संताप, कष्ट सहन केले. ज्याला कलावंत बनायचे असते, त्याला खडतर साधना करावी लागते. ती सूर्यकांतांनी केली.

यातच त्यांची कलासक्ती दिसून येते. पुढीलकालखंडात कलावंत म्हणून त्यांना जो मोठेपणा मिळाला, यश मिळाले त्याचा पाया या आरंभीच्या कालखंडात दिसून येतो. कलेचे प्रेम, गुरुजनांचा आदर्श, आणि कष्ट करण्याची तयारी या आधारे त्यांनी ही साधना पूर्ण केली म्हणूनच त्यांच्या उज्ज्वल भावितव्याचा पाया या कालखंडात घातला गेला. म्हणून त्यांच्या या आरंभीच्या कालखंडाचे त्यांच्या जीवनात महत्त्वपूर्ण स्थान आहे.

चित्रपटसृष्ठीतील यशोगाथा :

बालपणात चंद्रकांत यांच्यामुळे सूर्यकांतांचा चित्रपटसृष्टी शी संबंध आला अर्थात त्यावेळी सूर्यकांत वयाने लहान होते. त्यांनी चित्रपट व नाटकात छोट्या - छोट्या भूमिका केल्या आणि त्या गाजल्या. या कालखंडात त्यांच्या कलेचा पाया घातला गेला. याचाच परिणाम म्हणजे पुढे त्यांना अनेक संस्थांनी चित्रपटात प्रमुख भूमिका दिल्या. यातील पहिली भूमिका म्हणजे राजा नेने यांनी "केतकीच्या बनात" या चित्रपटात सूर्यकांतांनी हिरोची भूमिका दिली. सूर्यकांतांनी म्हटले आहे. "मी हिरो असलेलं हे पहिलंच चित्र".[१२] याच चित्रपटातील हाणामारीच्या एका दृश्यात त्यांना चापकाचा मार लागला. परंतु सूर्यकांतांना त्याचे काही वाटले नाही. या संदर्भात सूर्यकांतांनी राजा नेने यांना दिलेले उत्तर

महत्त्वपूर्ण आणि अर्थपूर्ण आहे. सूर्यकांत म्हणाले - "राजाभाऊ, टाकीचे घाव सोसल्याशिवाय देवपण येत नाही, तसंच चित्रपटात धाडसाशिवाय हिरो होता येत नाही."[१३] याच चित्रपटात काम करताना घोड्यावर बसण्याची त्यांना सवय नसताना त्यांनी घोड्यावर बसण्याची प्रॅक्टीस केली. घोड्यावर बसून एका प्रसंगाचे शूटींग करताना त्यांच्या आयुष्यात जीवघेणा प्रसंग निर्माण झाला. कारण ज्या घोड्यावर बसून ते दृश्य देणार होते. तो घोडा एका डोळ्याने आंधळा होता. पण घोड्याच्या मालकाने सूर्यकांतांना विनंती केली, "साहेब..... तुम्ही घोड्यावर चांगले बसता. पण माझं घोडंच एका डोळ्यानं आंधळं आहे. तेव्हा तुम्ही जरा सांभाळून घ्या. डायरेक्टरसाहेबांना हे सांगू नका. नाहीतर माझ्या घोड्याचं काम जाईल - म्हणजे पर्यायानं माझी भाकरी जाईल."[१४] घोडा एका डोळ्याने आंधळा असतानाही सूर्यकांतांनी त्या घोड्यावरचे दृश्य दिले. कारण त्या घोड्याच्या मालकाचे नुकसानही होऊ नये. यात त्यांच्या मनाचा मोठेपणा दिसतो. चित्रपटसृष्टीत असे अनेक धोके त्यांनी स्वीकारलेले दिसून येतात. त्यानंतर त्यांनी अनंत माने यांच्या "बाळा जो जो रे" मध्ये हिरोची भूमिका केली. याच चित्रपटात उषा किरण या प्रतिथयश अभिनेत्रीबरोबर काम करावे लागले. उषा किरणांना सूर्यकांत या नव्या नटाविषयी कांहीसा उपेक्षाभाव होता.

म्हणून त्या सूर्यकांतांना वेळोवेळी सूचना करत. परंतु सूर्यकांतांना स्वत:च्या अभिनयाबद्दल इतका विश्वास होता की त्यांनी उषा किरणना चार शब्द सुनावले. यात सूर्यकांताचा आत्मविश्वास दिसून येतो. त्याचबरोबर कलाकारांशी त्यांचे संबंध कसे होते हेही दिसून येते. याच चित्रपटातील एका प्रसंगात उषा किरणनी आपल्या ऐवजी डमी म्हणून एक्स्ट्रा मुलीला काम करण्यास सांगितले. तेव्हा सूर्यकांताला तो अपला अपमान वाटला या संदर्भात त्यांनी केलेली विधाने सूर्यकांतांच्या स्वाभिमानी प्रवृत्तीबरोबर उदार प्रवृत्तीची निदर्शक आहेत. प्रतिस्पर्धी कलाकाराबद्दल आदर बाळगूनही आपला प्रामाणिक विरोध ते नोंदवितात. हे वैशिष्ट्यपूर्ण आहे. या संदर्भात त्यांनी म्हटले आहे "मी एक वेळ कलाकार म्हणून उषाबाईंवर जरूर महत्त्व दिलं असतं. कारण त्यांची कामाची समज विलक्षण होती. त्या भूमिकेशी एकरूप होऊन काम करीत. पण त्यांच्या या स्वभावातल्या दोषाला मी कधीच महत्त्व दिलं नाही. मी तरी स्वत:ला कमी का आणि कशाकरिता समजायचं ? मी माझा स्वाभिमान कधीच सोडला नाही. या चित्रपटात जसं नायिकेला महत्त्व आहे, तसंच नायकालाही आहे. चित्रपटात मी (नायक) म्हणजे कांही नुसता कुंकवाचा धनी नाही."[९५] म्हणून त्यांनी उषाकिरण ऐवजी डमी वापरणार असतील तर आपल्याऐवजी डमी वापरावी अशी सूचना केली. या त्यांच्या उद्गारातून आणि वर्तनातून सूर्यकांतांच्या स्वत:च्या अभिनयावर किती विश्वास होता हे दिसून येते.

पुढे त्यांना "अखेर जमलं" या चित्रपटात, नायकाची भूमिका मिळाली. या चित्रपटात बेबी शकुंतला ही त्यांची नायिका होती. या चित्रपटात सूर्यकांत हा आपला नायक आहे. याचे त्यांना आश्चर्य वाटले. कारण भालजी पेंढारकरांच्या " मी दारू सोडली" या चित्रपटात त्या नायिका होत्या आणि त्यावेळी सूर्यकांत कॅमेरा डिपार्टमेंन्टमध्ये नोकर होते. स्टुडिओमधला एक "नोकर" आपल्या बरोबर नायक म्हणून येतो याचे शकुंतलाबाईंना आश्चर्य वाटले. परंतु सूर्यकांताचा अभिनय पाहिल्यानंतर त्यांनी आपली चूक कबूल केली. एवढेच नव्हेतर त्यांच्या अभिनयाचा गौरव केला. यातच सूर्यकांतांच्या अभिनयश्रेष्ठतेचे गमक दिसून येते. अभिनयातील या श्रेष्ठतेमुळे त्यांना प्रसिध्दी आणि पैसा दोन्हीही मिळू लागले.

"कांचनगंगा"या चित्रपटात हिरो म्हणून त्यांनी उषाकिरण बरोबर काम केले. या चित्रपटात एका अपघाताच्या दृश्यात सूर्यकांतांच्या-ऐवजी (डुप्लीकेट) वापरून शॉट घ्यायचे दिग्दर्शक माधवराव शिंदे यांनी ठरविले. परंतु सूर्यकांत यांनी त्यास विरोध केला. ते म्हणाले, "माधवराव, पिक्चरचा हिरो मी आहे. तेव्हा माझा शॉट मीच करणार. धाडस दुसऱ्यांनं करायचं आणि टाळ्या मी घ्यायच्या हे मला मान्य नाही."[१६] या दृश्यात सूर्यकांतांनी स्वतःच काम केले आणि त्यांना जखमा झाल्या पण त्या त्यांनी सहन केल्या. असेच धाडस त्यांनी "महाराणी येसूबाई"

या चित्रपटात घोड्यावर उडी मारून घोडा घेऊन जाण्यात केले. कारण त्यांनी म्हटले आहे, " मा. विठ्ठलरावांच्या सहवासाचा परिणाम म्हणा हवं तर, पण माझ्यात धाडसी वृत्ती निर्माण झाली."[१७] असेच धाडस त्यांनी "सासर माहेर" या चित्रपटातही केले. त्या चित्रपटातील एका मारामारीच्या प्रसंगात "डुप्लीकेट फायटर" ऐवजी आपणच ही मारामारी करणार असे सूर्यकांतांनी दिग्दर्शकाला बजाविले. प्रभाकर मुजुमदार यासारख्या बलाढ्य शरीराच्या फायटरबरोबर त्यांनी या चित्रपटात फाईट केली. त्यात त्यांना खूप शारीरिक वेदना झाल्या. परंतु ते दृश्य अधिक प्रभावी आणि परिणामकारक ठरले. कंपनीतील सर्व लोकांनी या धाडसाचे कौतुक केले. म्हणून ते म्हणतात"कंपनीत सर्वांनी केलेल्या कौतुकाच्या शब्दांनी मला या जखमांचं काही वाटलं नाही. मी स्वत: फाइट कंपोज केलेलं हे पहिलंच चित्र. या चित्रामुळं माझा धाडस विषयक आत्मविश्वास आणखी वृध्दिंगत झाला."[१८]

असाच एक धाडसाचा प्रसंग सुधीर फडके यांच्या एका चित्रपट शूटींगमधील त्यांनी वर्णन केला आहे. याच चित्रपटात नायकाची वाघाबरोबर झटापट होती. त्यावेळी पुण्यात देवलांची सर्कस आलेली होती. त्या सर्कशीतल्या वाघाबरोबर सूर्यकांतांनी झटापटीची शूटींग करायचे ठरविले. सुधीर फडके यांना "डुप्लीकेट" च्या आधारे तो सीन घ्यावा

असे वाटत होते. परंतु साहसी सूर्यकांतांनी ठामपणाने त्यांना सांगितले "हे पहा बाबूजी, पिक्चरचा हिरो मी आहे. आतापर्यंत माझं काम मी डुप्लीकेटरवी कुणाला करू दिलेलं नाही. तेंव्हा हेही काम मीच करणार."[९९] हा चित्रपट हिंदी मधूनही काढायचा होता. हिंदी चित्रपटसृष्टीतील लोक धाडस करतात तसे धाडस मराठी लोकांना जमेल का ? अशी शंका काहींनी व्यक्त केली. परंतु सूर्यकांतांनी आपल्या मनाशी ठरविले "हिंदी कलावंत जर आपल्या कलेशी इतके प्रामाणिक आहेत, तर आम्ही महाराष्ट्रीय काय कमी आहोत ? नाही, निश्चित नाही. आम्ही महाराष्ट्रीय स्वतःला सिंहाचे छावे म्हणवतो आम्ही मागे राहून कसं चालेल ?"[१००] या शूटींगच्या रिहलर्सच्या वेळेला वाघाच्या झटापटीच्या दृश्यात त्यांना बरीच शारीरिक वेदना झाली, जखमा झाल्या परंतु तो सीन अत्यंत प्रभावी वटला मात्र प्रत्यक्षात या दृश्याचे शुटींग झालेच नाही. त्यामुळे त्यांना दुःख वाटले. एवढे धाडस करून चीज झाले नाही म्हणून एक खंत त्यांच्या मनात राहिली.

असाच एक जीवावरचा प्रसंग "पुनवेची रात्र" या चित्रपटात आला. नदीत पोहण्याचा तो प्रसंग होता. त्यावेळेला शेवटचा शॉट घेत असताना त्यांनी नदीत जोरात उडी मारली त्यामुळे ते तळाला गेले. त्यामुळे ते लवकर वर येईनात. नाकातोंडात पाणी गेले तरी जीव वाचविण्यासाठी त्यांनी हातापायाची हालचाल केली आणि वर आले तेंव्हाचा प्रसंग जीवघेणा होता. त्याचे त्यांनी वर्णन केले आहे. "शिकलेली बायको"

या चित्रपटातही त्यांनी असाच धाडसाचा प्रसंग ओढवून घेतला. एका बकऱ्याबरोबर आपली झुंज होते आहे असे दृश्य दाखवावे असे त्यांनी दिग्दर्शक माधवराव शिंदे यांना सुचविले. माजलेल्या बकऱ्याशी झुंज देणे हे कठीण काम होते. पण धोका पत्करून त्यांनी ते व्यवस्थित पार पाडले. असे धोकादायक प्रसंग स्वीकारण्यात सूर्यकांतांची साहसी प्रवृत्ती दिसून येते. कलावंताला एक कठोर साधना करावी लागते हे त्यांच्या कलावंताच्या जीवनातून दिसून येते. म्हणून त्यांनी म्हटले आहे ते अर्थपूर्ण वाटते. त्यांनी म्हटले आहे "असे अनेक कठीण प्रसंग मी स्वत: ओढवून घेतले व ते पारही पाडले, कधी कधी जखमाही झाल्या पण त्या दु:खापेक्षा सीनचा आनंद मला जास्त महत्त्वाचा वाटत असे."[१०१] या त्यांच्या उद्गारातून सूर्यकांतांतला हाडामासाचा जिवंत कलावंत दिसून येतो. याच चित्रपटातील बैलगाडीच्या शर्यतीत त्यांनी स्वत: भाग घेऊन तो सीन चांगला वठविला. अर्थात या प्रसंगात त्यांना जखमा झाल्या. परंतु जखमांची पर्वा न करता त्यांनी असे धाडसाचे प्रसंग करून दृश्यामध्ये जीवंतता आणली हे वैशिष्टपूर्ण होय.

चांगली शरीरयष्टी, चांगला अभिनय आणि त्याच्या जोडीला साहसीपणा या गुणामुळे सूर्यकांतांनी अनेक चित्रपटात नायक म्हणून केलेल्या भूमिका गाजल्या. ऐतिहासिक, ग्रामीण चित्रपटातील त्यांच्या भूमिकांत एक प्रकारचा जिवंतपणा आढळतो. त्याचे कारण त्यांच्या या साहसी वृत्तीत

त्यांच्या कलेची जाणही आपल्याला जाणवते.

नायक म्हणून त्यांनी चांगल्या भूमिका केल्या याचे रहस्य केवळ साहसीपणात नाही तर आपल्या वाट्याला जी भूमिका आलेली आहे ती अधिकाधिक स्वाभाविक,जीवंत आणि प्रभावी वाटावी म्हणून ते परिश्रमही घेत असत. वरील साहसी प्रसंगात त्या परीश्रमाची झलक दिसून येते. जिवंत वाघाशी झुंज घेणे, घोड्यावर बसणे, बैलगाड्यांच्या शर्यती जिंकणे, नदीत पोहणे अशा अनेक प्रसंगाच्यावेळी त्यांनी त्याचा सराव केलेला दिसून येतो. हे वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्या वैशिष्ट्याचा एक सुंदर अविष्कार म्हणजे "साधी माणसं" याच चित्रपटातील शंकर लोहारची भूमिका अत्यंत प्रभावीपणे वठवली. परंतु त्यासाठी त्यांनी जे परीश्रम घेतले ते पाहण्यासारखे आहे. ही भूमिका "साधी" असली तरी "मोठी" होती. म्हणून भालजींनी त्यांना बजावले "चामन, ही भूमिका आजवर केलेल्या भुमिकेपेक्षा वेगळी आहे यात तुझ्या अभिनयाचा कस लागणार. नुसते संवाद चांगले बोलून भागणार नाही. त्याबरहुकूम सोंगही चांगले असले पाहिजे. याची जबाबदारी मी तुझ्यावर सोपवितो."[१०२] ही भूमिका चांगली वठावी म्हणून प्रत्यक्षात एका लोहाराच्या हालचाली पंधरा दिवस लांबून पाहिल्या आणि त्यांच्या मनात शंकर लोहार संचारला. ही भूमिका त्यांनी इतकी चांगली वठवली की त्या चित्रपटाला आणि त्यांना स्वत:लाही "ॲवॉर्ड" मिळाले.

खलनायक : भूमिकेचे आव्हान :

सूर्यकांतांनी नायक म्हणून जशा चांगल्या भूमिका वठवल्या त्याचप्रमाणे खलनायक म्हणूनही चांगल्या भूमिका वठवल्या. परंतु त्यासंदर्भात त्यांना आरंभी विश्वास नव्हता. परंतु त्यांचे गुरु भालजी पेंढारकर यांनी त्यांच्या "माझी जमीन" या चित्रपटात नायकाऐवजी खलनायकाची भूमिका सूर्यकांतांना दिली. तेव्हा नाराज झालेल्या सूर्यकांतांना त्यांनी ठणकावून सांगितले, "सूर्यकांत, नटाला कोणतीही भूमिका करता आली पाहिजे. एकाच छापाच्या भूमिका करणाऱ्या नटालामी नट म्हणत नाही........ प्रत्येक व्यक्तीरेखा नटाला वेगळ्या ढंगात साकार करता आली पाहिजे. त्याचं चालणं, बोलणं, स्वभाव, त्याच्या सवयी ...... लेखकानं शब्दसमात रेखाटलेली व्यक्ती त्याच्याकल्पनेबरहुकूम नटानं अभिनयाने साकार करायची असते."[१०३].

सूर्यकांतांनी "मूकं लेकरू" या चित्रपटात प्रथमतः "काळ्या रामोशी" या खलनायकाची भूमिका केली. त्यासाठी त्यांनी पालीच्या खंडोबाच्या यात्रेत मांग आणि रामोशी लोकांचे निरीक्षण केले. ही भूमिका त्यांनी चांगल्या रीतीने वठवली. त्यानंतर भालजी पेंढारकरांच्या "माझी जमीन" या चित्रपटात माजलेल्या एका आडदांड मास्ती पैलवानाची भूमिकाही प्रभावीपणे केली. श्रेष्ठ कलावंत हा कलाक्षेत्रातील आव्हाने

कशी स्वीकारतो आणि अशी आव्हाने स्विकारण्यात त्या कलावंताचे मोठेपणा कसे असते हे यावरुन दिसून येते. असे आव्हान स्विकारण्याच्या त्यांच्या प्रवृत्तीमुळे त्यांनी "आम्ही जातो आमुच्या गावा" चित्रपटात विनोदी भूमिका केली.

दिग्दर्शक व निर्माता : एक नवे आव्हान :

चित्रपट सृष्टीत अनेक वर्षे वावरल्यामुळे सूर्यकांतांना चित्रपटांच्या विविध अंगाचे ज्ञान झाले होते. तांत्रिक गोष्टी समजल्या होत्या. कथा, पटकथा, संवाद, यांचे लेखन, सहाय्यक दिग्दर्शक म्हणून वेळोवेळी केलेली कामे; कॅमेरामन म्हणूनही केलेली कामे; यामुळे चित्रपट निर्मितीचे विविध अनुभव त्यांना मिळाले होते. म्हणूनच त्यांच्या मनात आपण स्वत:ची एखादा चांगला चित्रपट दिग्दर्शित करावा व तो चित्रपट आपण स्वत:च काढावा अशी इच्छा त्यांच्या मनात १९७२ मध्ये निर्माण झाली. त्या इच्छेचे महत्त्वाकांक्षेत रुपांतर झाले ते १९७२ मध्ये. तासगावच्या गणपतीचे - जागृत देवस्थान म्हणून प्रसिद्ध होते - दर्शन घ्यायला जाताना त्यांच्या मनात या महत्त्वकांक्षेने उचल खाल्ली. या संदर्भात त्यांनी म्हटले आहे, "कुणी तरी सांगितले हा गणपती जागृत देवस्थान आहे. आजवर माझ्या मनात एक इच्छा होती दिग्दर्शक होण्याची ...... माझी इच्छा पूरी होण्याकरता मी गणपतीला मनात आळवले.मनोभावे

नमस्कार केला. मनातल्या मनात नवस बोलले, " गणराया माझी दिग्दर्शक होण्याची इच्छा पुरी झाली तर मी यांदीचे डोळे वाहीन"[१०४] नाट्यव्यवसायातील मित्र श्री. मधू भोसले यांच्याशी त्यांनी विचार-विनीमय केला. तेव्हा भोसले यांनी "ईर्षा" या कथेची कल्पना मांडली. पत्नीचे आजारपण व ऑपरेशन, मधू भोसले यांचा मृत्यू. आर्थिक अडचणी, कलावंतांचा लहरीपणा, राजा परांजपेचा मृत्यू - अशा अनेक अडचणींतून त्यांनी "ईर्षा" हा चित्रपट मोठ्या ईर्षेने पूर्ण केला. या कामात त्यांना अडचणी आल्या असल्या तरी सूर्यकांताच्या चांगल्या स्वभावामुळे श्री. चारुदत्त सरपोतदार, श्रीमती आशाबाई, श्रीमती सुलोचनाबाई, श्री. सुधीरजी, श्री. शरद तळवलकर, श्री. चित्तरंजन, श्री. वसंतराव, श्री. धुमाळ यासारख्या श्रेष्ठ कलावंतांनी या चित्रात विनामूल्य काम केले. हा चित्रपट चांगला निघाला आणि गाजलाही.

या चित्रपटाच्या संदर्भात त्यांनी सांगितलेले अनुभव वाचल्यानंतर असे दिसून येते की, सूर्यकांतांची परमेश्वरावर गाढ श्रध्दा होती. म्हणून ते नवस करतात. महत्त्वाकांक्षी असल्याने अनेक अडचणींतून ते चित्रपट साकार करतात यात त्यांची जिद्द दिसून येते. आणि चांगल्या कलाकारांचा मिळालेला प्रतिसाद पाहून सूर्यकांत किती प्रेमळ, प्रामाणिक होते याचेही दर्शन घडते. त्याचबरोबर कलाकारांचा लहरीपणा सांभाळताना भालजी पेंढारकरांप्रमाणे ते कठोर होत. त्याचेही एके ठिकाणी दर्शन घडते.

सौ. मराठे नावाच्या स्त्री ची मुलगी या चित्रपटात काम करणार होती. खाण्यापिण्याच्या बाबतीत या बाईने भलतेच हट्ट धरल्यामुळे त्यांनी रेल्वेची तिकिटे काढून त्यांना दोघींनाही परत पाठविले. चित्रपटाची हिरॉईन गेली आणि पेचप्रसंग उभा राहिला. परंतु सूर्यकांत डगमगले नाहीत. त्यावेळचे त्यांचे उद्गार "मी काही कच्च्या गुरुचा चेला नाही" (पृ. ३९५) हे अर्थपूर्ण आहेत. अशावेळेला उषा नाईकला ते बोलावितात आणि तीही सूर्यकांतांसाठी पैशाची किंवा इतर कोणतीही अट न घालता काम करते. हा प्रसंग त्यांच्या व्यक्तिमत्वावर प्रकाश टाकतो.

कोणत्याही नव्या गोष्टीचे आव्हान स्विकारणे आणि कार्य पूर्ण करणे हे सूर्यकांतांच्या व्यक्तिमत्वाचे महत्वाचे वैशिष्ट्ये होय. याच दृष्टीने त्यांनी दिग्दर्शनाचे आव्हान स्विकारले आणि त्यात ते यशस्वी झाले. असेच त्यांनी एक स्वीकारलेले आव्हान म्हणजे व्हीलनचे काम श्री. किरण दुधाळकर यांच्या "पाठलाग" या नाटकात दुधाळकर यांनी त्यांना एका स्मगलरची भूमिका दिली. आतापर्यंत त्यांनी नायकांच्या भूमिका केल्या असल्यामुळे ही भूमिका कशी काय करायची हा प्रश्न त्यांच्यापुढे उभा राहिला. तरी त्यांनी ती भूमिका स्वीकारली कारण "या भूमिकेत त्या स्मगलरच्या स्वभावाच्या अनेक छटा होत्या. त्या कलावंताला आव्हानात्मक होत्या. त्या भूमिकेच्या अनेक पैलूतून स्मगलरची

व्यक्तिरेखा कलावंताला प्रेक्षकांसमोर उभी करायची होती आणि म्हणून मी या भूमिकेचं आव्हान स्वीकारलं"[१०५] सूर्यकांताची ही व्हिलनची भूमिका खूप गाजली; आणि सर्व वृत्तपत्रात त्या भूमिकेचे कौतुक करण्यात आले. यातही सूर्यकांतांची जिद्द, महत्त्वाकांक्षा आणि अभिनयाची कुशलता दिसून येते.

याच भूमिकेतून त्यांनी भालजी पेंढारकरांच्या "गनिमी कावा" या ऐतिहासिक चित्रपटात सहाय्यक दिग्दर्शक म्हणून जबाबदारी उचलली आणि यशस्वीपणे पार पाडली. यासंधीचा त्यांना अभिमान वाटत होता. कारण त्यांचे गुरु भालजी पेंढारकर यांनी ही संधी त्यांना दिली होती. म्हणून त्यांनी खूप परीश्रम घेतले. पण भालजींनी सहाय्यक दिग्दर्शक म्हणून दादा कोंडके यांचे नाव घातले आणि सूर्यकांतांना टाळले ही गोष्ट त्यांना खटकली. वास्तविक पाहता सूर्यकांतांसारख्या एका श्रेष्ठ अभिनेत्याचा, दिग्दर्शकाचा हा अपमान होता. पण गुरुप्रेमापोटी सूर्यकांत या घटनेचे वर्णन संयमाने,स्पष्टपणे करतात. मात्र त्यात त्यांनी कटुता आणली नाही हे वैशिष्ट्यपूर्ण वाटते.

## चित्रनगरीचे स्वप्न :

कोल्हापुरात चित्रनगरी व्हावी अशी अनेक कलावंतांची इच्छा होती. त्याचप्रमाणे सूर्यकांतांचीही होती. त्यासाठी त्यांनी केलेल्या

धाडपडीचे "स्वप्ननगरी !....... चित्रनगरी !" या प्रकरणात आलेले चित्रण पाहण्यासारखे आहे. चित्रनगरी व्हावी म्हणून शासनातले सर्वच मंत्री आश्वासन देत होते. व्ही शांताराम सारखा एक श्रेष्ठ मनुष्यही प्रयत्न करीत होता. परंतु प्रत्यक्षात त्यासाठी चिकाटीने प्रयत्न कोणीच करीत नव्हते; ते सूर्यकांतांनी केले. चित्रनगरीसाठी निवडायची जागा अनेक वादात सापडली. विशेषात: मोफत जागा देऊ म्हणणा-या व्ही. शांताराम यांनी त्याची किंमत मागायला सुरुवात केली. ही गोष्ट सूर्यकांतांना खटकली. तरीही शेवटी अनेक प्रयत्न करून सूर्यकांतांनी चित्रनगरीचे स्वप्न पूर्ण केले. हे स्वप्न पूर्ण करून ज्या चित्रपटसृष्टीने त्यांना घडविले; यश, पैसा, प्रतिष्ठा मिळवून दिले; त्या चित्रपटसृष्टीला त्यांनी दिलेले हे फार मोठे योगदान आहे. त्यात त्यांचा कृतज्ञताभाव दिसून येतो.

— o —

## संदर्भ आणि टीपा


१) पेंढारकर भालजी — "साधा माणूस"
मौज प्रकाशन गृह, मुंबई. १९९३
प्रभाकर पेंढारकरांचे प्रस्तावनेतील मत पृ. ११

२) पेंढारकर भालजी — तत्रैव. पृ. ११

३) पेंढारकर भालजी — तत्रैव. पृ. ११

४) पेंढारकर भालजी — तत्रैव. पृ. ११

५) कुसुमाग्रज (संपादक) — "पिंपळपान"
कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, द्वितीय आवृत्ती
"माझा मृत्युलेख" पृ. १०८

६) पेंढारकर भालजी — उनि. पृ. २१ (प्रस्तावना)

७) पेंढारकर भालजी — तत्रैव. पृ. २०

८) पेंढारकर भालजी — तत्रैव. पृ. २ ते ३

९) पेंढारकर भालजी — तत्रैव. पृ. १२

१०) पेंढारकर भालजी — तत्रैव. पृ. ७८

११) पेंढारकर भालजी — तत्रैव. पृ. १०८

१२) पेंढारकर भालजी — तत्रैव. पृ. ९७

१३) पेंढारकर भालजी — तत्रैव. पृ. १९

१४) पेंढारकर भालजी — तत्रैव. पृ. २९

| | | |
|---|---|---|
| १५) | पेंढारकर भालजी | तत्रैव. पृ. ४६ |
| १६) | पेंढारकर भालजी | तत्रैव. पृ. ४७ ते ४८ |
| १७) | पेंढारकर भालजी | तत्रैव. पृ. १३ (प्रस्तावना) |
| १८) | पेंढारकर भालजी | तत्रैव. पृ. ५५ |
| १९) | पेंढारकर भालजी | तत्रैव. पृ. १३८ ते १३९ |
| २०) | मांडरे सूर्यकांत | घाकटी पाती,<br>पुरंदरे प्रकाशन, पुणे द्वितीय आवृत्ती १९९२<br>पृ. ४१ |
| २१) | मांडरे सूर्यकांत | तत्रैव. पृ. ६५ |
| २२) | पेंढारकर भालजी | उनि. पृ. ५ |
| २३) | पेंढारकर भालजी | तत्रैव. पृ. ६७ |
| २४) | पेंढारकर भालजी | तत्रैव. पृ. ६८ |
| २५) | पेंढारकर भालजी | तत्रैव. पृ. ७० |
| २६) | पेंढारकर भालजी | तत्रैव. पृ. ८० ते ८१ |
| २७) | पेंढारकर भालजी | तत्रैव. पृ. ८५ |
| २८) | पेंढारकर भालजी | तत्रैव. पृ. ९९ |
| २९) | पेंढारकर भालजी | तत्रैव. पृ. १७७ |

| | |
|---|---|
| ३०) पेंढारकर भालजी | तत्रैव. पृ. १०७ |
| ३१) पेंढारकर भालजी | तत्रैव. पृ. १६५ |
| ३२) पेंढारकर भालजी | तत्रैव. पृ. १६ (प्रस्ता.) |
| ३३) पेंढारकर भालजी | तत्रैव. पृ.१७ (प्रस्ता.) |
| ३४) पेंढारकर भालजी | तत्रैव. पृ. १८ (प्रस्ता.) |
| ३५) पेंढारकर भालजी | तत्रैव. पृ. ९८ |
| ३६) पेंढारकर भालजी | तत्रैव. पृ. १०० |
| ३७) पेंढारकर भालजी | तत्रैव. पृ. १७९ ते १८० |
| ३८) पेंढारकर भालजी | तत्रैव. पृ. १५ (प्रस्ता.) |
| ३९) पेंढारकर भालजी | तत्रैव. पृ. १५३ |
| ४०) पेंढारकर भालजी | तत्रैव. पृ. १६५ |
| ४१) पेंढारकर भालजी | तत्रैव. पृ. ९ (प्रस्ता.) |
| ४२) पेंढारकर भालजी | तत्रैव. पृ. १७२ |
| ४३) पेंढारकर भालजी | तत्रैव. पृ. १०७ |
| ४४) पेंढारकर भालजी | तत्रैव. पृ. १८३ |
| ४५) पेंढारकर भालजी | तत्रैव. पृ. ११४ |
| ४६) पेंढारकर भालजी | तत्रैव. पृ. ९९ |

| | |
|---|---|
| ४७) मांडरे सूर्यकांत | उनि॰ (ऋणनिर्देश) |
| ४८) मांडरे सूर्यकांत | उनि॰ (ऋणनिर्देश) |
| ४९) बेडेकर मालती | माझे आत्मचरित्र आणि मी,<br>ललित दिवाळी अंक, नोव्हे॰डिसे॰८१ पृ॰४८ |
| ५०) शेख मीर इसहाक | लक्ष्मीबाई टिळकांची स्मृतीचित्रे : एक चिंतन<br>प्रतिमा प्रकाशन, पुणे॰ १९८७ पृ॰ १६ |
| ५१) मांडरे सूर्यकांत | उनि॰ (ऋणनिर्देश) |
| ५२) मांडरे सूर्यकांत | तत्रैव॰ (ऋणनिर्देश) |
| ५३) मांडरे सूर्यकांत | तत्रैव॰ पृ॰ १० |
| ५४) मांडरे सूर्यकांत | तत्रैव॰ पृ॰ १३ |
| ५५) मांडरे सूर्यकांत | तत्रैव॰ पृ॰ १५ |
| ५६) मांडरे सूर्यकांत | तत्रैव॰ पृ॰ १५ |
| ५७) मांडरे सूर्यकांत | तत्रैव॰ पृ॰ ३९ |
| ५८) मांडरे सूर्यकांत | तत्रैव॰ पृ॰ ४० |
| ५९) मांडरे सूर्यकांत | तत्रैव॰ पृ॰ ४१ |
| ६०) मांडरे सूर्यकांत | तत्रैव॰ पृ॰ ५२ |

६१) मांडरे सूर्यकांत तत्रैव. पृ. ५३

६२) मांडरे सूर्यकांत तत्रैव. पृ. ६२

६३) मांडरे सूर्यकांत तत्रैव. पृ. ६९

६४) मांडरे सूर्यकांत तत्रैव. पृ. ७४ ते ७५

६५) मांडरे सूर्यकांत तत्रैव. पृ. ७५

६६) मांडरे सूर्यकांत तत्रैव. पृ. १४७

६७) मांडरे सूर्यकांत तत्रैव. पृ. १४७

६८) मांडरे सूर्यकांत तत्रैव. पृ. ३५२

६९) मांडरे सूर्यकांत औक्षण - बाबासाहेब पुरंदरे यांचे मत उद्धृत

७०) मांडरे सूर्यकांत तत्रैव. पृ. १३

७१) मांडरे सूर्यकांत तत्रैव. पृ. ४०

७२) मांडरे सूर्यकांत तत्रैव. पृ. ५२

७३) मांडरे सूर्यकांत तत्रैव. पृ. ५२

७४) मांडरे सूर्यकांत तत्रैव. पृ. ८९

७५) मांडरे सूर्यकांत तत्रैव. पृ. १४४

| | |
|---|---|
| ७६) मांडरे सूर्यकांत | तत्रैव. पृ. ३६३ ते ३६४ |
| ७७) मांडरे सूर्यकांत | तत्रैव. पृ. ३९२ |
| ७८) मांडरे सूर्यकांत | तत्रैव. पृ. ४५४ |
| ७९) मांडरे सूर्यकांत | तत्रैव. प. ल. देशपांडे यांचे प्रास्ताविक पत्र उद्धृत |
| ८०) मांडरे सूर्यकांत | तत्रैव. पृ. ३३६ |
| ८१) मांडरे सूर्यकांत | तत्रैव. पृ. ३७२ |
| ८२) मांडरे सूर्यकांत | तत्रैव. पृ. १०३ |
| ८३) मांडरे सूर्यकांत | तत्रैव. पृ ३७० |
| ८४) मांडरे सूर्यकांत | तत्रैव. पृ. ३७० |
| ८५) मांडरे सूर्यकांत | तत्रैव. औक्षण - बाबासाहेब पुरंदरे यांचे मत, मुलाबरहुकूम |
| ८६) मांडरे सूर्यकांत | तत्रैव. पृ. १३ |
| ८७) मांडरे सूर्यकांत | तत्रैव. पृ. १५ |
| ८८) मांडरे सूर्यकांत | तत्रैव. पृ. ३९ |
| ८९) मांडरे सूर्यकांत | तत्रैव. पृ. ४० |
| ९०) मांडरे सूर्यकांत | तत्रैव. पृ. ४६ |
| ९१) मांडरे सूर्यकांत | तत्रैव. पृ. ४८ |

९२) मांडरे सूर्यकांत तत्रैव• पृ• ९४

९३) मांडरे सूर्यकांत तत्रैव• पृ• ९६

९४) मांडरे सूर्यकांत तत्रैव• पृ• ९७

९५) मांडरे सूर्यकांत तत्रैव• पृ• ११३

९६) मांडरे सूर्यकांत तत्रैव• पृ• ११७

९७) मांडरे सूर्यकांत तत्रैव• पृ• १२९

९८) मांडरे सूर्यकांत तत्रैव• पृ• १३०

९९) मांडरे सूर्यकांत तत्रैव• पृ• १३२

१००) मांडरे सूर्यकांत तत्रैव• पृ• १३२

१०१) मांडरे सूर्यकांत तत्रैव• पृ• १६७

१०२) मांडरे सूर्यकांत तत्रैव• पृ• २३०

१०३ मांडरे सूर्यकांत तत्रैव• पृ• १२४

१०४) मांडरे सूर्यकांत तत्रैव• पृ• ३८६

१०५) मांडरे सूर्यकांत तत्रैव• पृ• ४१५